# अकारण ( कविता )

-- चं. प्र. देशपांडे



## अकारण

मोठ्या कारखान्यांची जन्मकथा
मला नाही समजत
काही लोक सांगतात
इतिहासाची सकारण साखळी
जिच्यावर माझा
विश्वासच बसू शकत नसल्याने
मी विसरून जातो

त्यामुळे कट्टर ध्येयवाद्यांना
मी निरर्थक वाटतो किडामुंगी

खरे तर हेही नसते खरे
असंख्य कारणांमुळे
हेही अकारणच म्हणावे लागेल
--- ००० ---

आर्वो मेटस या रशियन कवीची एक साधी छान कविता --

अनुपस्थित

कधी मी वसंतात पुसटतो
किंवा कधी एखाद्या जमावात
किंवा एखाद्या थारोळ्यात

काही वेळा निळाईत

माझा शोध घेण्यात अर्थ नाही ः
मी मजेत असतो
--- ००० ---

हेन्रिक हेन या जर्मन कवीची एक कविता --

त्यांचे एकमेकांवर प्रेम होते

त्यांचे एकमेकांवर प्रेम होते पण एकानेही
दुसऱ्यासमोर ते शक्य असूनही मान्य केले नाही ः
शत्रू म्हणूनच पाहिले त्यांनी एकमेकांकडे,
आणि जवळजवळ मृत्यूच पत्करला त्यांनी त्या प्रेमासाठी.
शेवटी ते दूर झाले एकमेकांपासून आणि मग फक्त
भेटू लागले ते कधीकधी एकमेकांना स्वप्नात ः
खरे तर बऱ्याच काळापूर्वी ते मृत्यू पावले होते,
पण त्यांना ते फारसे माहीतच नसावे, बहुतेक.

--- ००० ---

माती

अस्ताव्यस्त भूस्खलनची
करतो मी कल्पना
आणि माझ्या सत्याची माती होते

याचा दोष अर्थातच
मी निसर्गाला देतो
आणि पोट दुखू लागल्याने
मी मान्य करतो की
हा घटाघट पाणी पिण्याचाच
अटळ परिणाम आहे

माझ्या चुकीलाही
नैसर्गिक म्हणण्याचा
माझा डाव थांबवू नाही शकत
माझी घसरती माती

--- ००० ---

## सर्वांत घाणेरडा विचार

सर्वांत घाणेरडा विचार
जेव्हा आला मनात
तेव्हाच लगाम आपल्या हातांत
असण्याचे भ्रम दिले सोडून

सर्व विशेष शाखांचे ज्ञान
शक्यही नव्हते आणि त्यांच्या
हिंसक प्रभुत्वातून सुटणेही

त्यामुळे मग यायचे ते येवोत
विचार अशी फेकाफेकच सुरू केली

मग विचार कोणतेही कसलेही कुणाचेही
असोत

--- ००० ---

स्टोरी

मी कोणत्या स्टोरीवर
विश्वास ठेवणे सुसंगत होईल
ते माझ्या
जनुकनकाशा मास्टरला विचारले
आपलीच माणसे आपल्याच माणसांना
कशी नष्ट करतील
हा माझा प्रश्न होता

तुला साधायचेय काय ते बघ
गणित विसर – तो म्हणाला

निर्बुद्ध आणि सुबुद्ध दोन्ही एकच
हे समजल्याशिवाय
तुझी बाजू पक्की होणारच नाही
तो म्हणाला
--- ००० ---

अध्वर्यू

तो एक काहीसा मान्यताप्राप्त
अध्वर्यू होता
त्याच्या बोलण्याचे परिणाम
अमुक एका बाजूलाच फेव्हरेबल
होताहेत अशी शंका बळावत राही

त्यामुळे दुसऱ्या बाजूने
एक टीमच नेमली गेली सतत
त्याच्या बोलण्याचे
विपरीत अर्थच प्रसृत करण्यासाठी

तो म्हणाला की कशाला
घेताय इतका त्रास मुळातच
मी विपरीतच तर बोलत असतो

हे संभाषण झाले व्हायरल
तेव्हापासून लोक जाणीवपूर्वक
खोलातले खरे अर्थ
शोधायच्या मागे लागले

--- ००० ---

## निसर्ग

निसर्ग असू शकतो
तुमच्या विरोधात
विषाचा बारावा थेंब तरी
आडवे करणारच तुम्हाला

तुम्ही करता मानसिक प्रतिकार
बाहेरचा कणही नष्ट न करता

तुमच्या प्रतिकाराने
तुमचेच उरलेले अवसान संपते

शेवटी हताश होत
तुम्ही वाट पाहायचे ठरवता
आशेला वाव मिळण्याची
--- ००० ---

## कवच

शब्दांचे कवच फोडणे
असते दुःखाचे कवच फोडणे
असते कवितेचा गर दिसणे

पण देह तर सगळे
सारखेच कवितांचे
उत्तेजक

आता कविता म्हणजे
नव्हे माझे दुःख
कसा काही असणार कसलाही
माझा दावा

कुणाचीही असो ही कविता
मी तर फक्त फुटलेले कवच
--- ००० ---

मूड

त्या त्या दिवशी
तेवढा तेवढा न संपता
साठत जातो पावसाळा
जणू जिन्याखालच्या कोंदट जागेत
आणि एक दिवशी तडफडू लागते मन

पराभूत झाल्याचे तरी सांगणार कुणाला
पावसाळा हा काही
मूड नसतो निसर्गाचा

आता शत्रूच्या कृपेवर जे होईल
ते होईल असे म्हणावे तर
आपल्यालाच आपलाच नाजुकपणा
असह्य होऊन रडू येते

रडणे हा आपला जणू
एक अटळ असा मूडच असतो
--- ००० ---

## तुम्हाला जे हवे आहे

तुम्हाला जे हवे आहे
त्यात मला इंटरेस्ट नाही
मी तर तुमच्यासमोर
तुमच्याच हत्येचे रहस्य
उलगडू इच्छितो

मी निःशस्त्र फिरतो कुठेही
तुमचा माझ्यावर रागही नसतो
आता आपण दोघेही निर्धोक असतो

तुम्ही आधीच मयत
आणि मी निःशस्त्र

निःशस्त्र म्हणजे येतेय का लक्षात
-- मरायला नकार देणे
--- ००० ---

परत खिशात जातो फोन

उत्सवांचे थरांवर थर
आणि दुःखांनाही सोकावलेले मन
वेदनेसह मिळणाऱ्या
जिवंत असण्यासाठी

गेले ते बालपण
असे म्हणायला लागूनही
आता बरीच वर्षे झाली

एका क्षणी गाडी बाजूला घेतली जाते
थांबून विचार करावासा वाटतो
की कुणाला करावा फोन

मुळातच साचलेले न पाहिलेले
मेसेज पाहून परत खिशात जातो फोन

जाऊ दे -- राहिलेत किती आता दिवस
असे म्हणत आपण असे म्हणण्यासह सर्वच
सवयींना सोकावल्याचे समजते
--- ००० ---

सफरचंद

आटापिटा नसला तरी
सहजच येते एखादे स्वप्न जगण्यात
पुन्हा पुन्हा

त्याच्या विचारात नसते बुडायचे
वा नसते अधीर व्हायचे जागरण करत

आभासी जगातून अचानक
समोरच पडते सफरचंद
वाट न पाहिलेले
आणि येतो क्षण
सर्वस्वप्रतिसादाचा

हे गुरुत्वाकर्षण नसते
हे असते सर्व दिशांनी
सर्व दिशांकडे आकर्षित होणे

या सर्व स्पंदनांचा केंद्रबिंदू
स्वतःचे मन असलेले तीव्र
--- ००० ---

महत्त्वाचा फरक

आपण कुणाचेतरी खाद्य आहोत
हे एकदा समजलेले असल्यावर
हिंसा कसली
त्या त्या वेळी त्याला त्याला
खाद्य तर मिळायलाच हवे

एकच मिनिटापूर्वी आपण होतो
आता नाही
एका बाजूने मगर
आणि दुसरीकडून तीन लांडगे
आणि मधे आपण एक गरीब बिचारे हरीण

एवढे आपल्याला माहीत आहे
आणखी खोलात गेलो तर कदाचित
नंतर कुणाला काय वाटले तेही कळेल

आपल्याला मरायचे नव्हते
हे दुर्लक्षून आपण मारले गेलो
याचे आपल्याला खूप वाईट वाटले

आहेत त्यांना मात्र अजून काही काही
वाटत राहायची सोय आहे
या जगात हाच आता एक महत्त्वाचा फरक
--- ००० ---

## जातयेत असतील

पावसाळी हवेत पुन्हा त्याच ठिकाणी
तो दिसला मला जमिनीवरून हळूहळू चालणारा
सुमारे दीड इंचाचा रंगीबेरंगी केसांचा
एक ब्यूटिफुल किडा

मी पुन्हा काळजी घेतली
माझे पाऊल त्याच्यावर न पडण्याची

कशाला इतके सगळे ब्यूटिफुल
आणि तो नसताच ब्यूटिफुल तर

दिला सोडून तो विचार आणि गृहीत धरले मनात
की मीही नष्ट होऊ नये याची काळजी घेत
जातयेत असतील काही अस्तित्वे जगात

आणि मलाही ते समजत नसेल

--- ००० ---

माझ्या आजोबांची सही

माझ्या आजोबांची सही असलेले
एक जीर्ण पुस्तक
मी त्यांना पाहिले नसले तरी
त्यांची आठवण
असू दे म्हणून ठेवलेले

आता काय त्याचे
मीच आणतोय आटोपशीरपणा
माझेच बरेच नष्ट करत
मीच नाकारलेले

ना ते पुस्तक कुणी वाचणार
ना कुणी त्यांची आठवण पूजत बसणार

माझ्याच मीच नाकारलेल्यात
आता मी तेही घेतोय

--- ००० ---

## टाळ्या

पुन्हा रात्र आली
तीच कालचीच

अंग खाजण्याची ऍलर्जी चालूच आहे
शरीरात सतत आरत्यांच्या टाळ्या भिनल्याने

असमाधानातून कमकुवतपणा येतो
की उलट

प्रतिसादाची वा प्रतिकाराची यंत्रणा
माझ्या ताब्यात नाहीय माझी

सर्वच टाळ्या पाळत
ठेवून आहेत माझ्यावर सतत

आणि औषधाच्या गोळीने
मला झोप येतेय

--- ००० ---

आधी आळंदीला

कालचा दिवस नीट
जगला गेला नसेल
तर झालेगेले झोपेला प्रदान

झोपही नीट झाली नसेल
तर मुंबईतच जगणे भाग आहे
हे समजून मिळेल तेवढ्या

श्वासात पुरवत जगावे
अगदी आजच्याही या शहरात
अशी काय जिवाची करणार

निसर्ग न पाहिल्याने
मधुमेह होतो हे संशोधन
ठेवलेय आधी आळंदीला समाधीसमोर
--- ००० ---

शून्य आणि सेक्स

मध्यरात्र म्हणजे उत्तेजकतेचा
उच्चबिंदू मध्यान्हच --
तरीच मी विचारात होतो
की ती प्रौढ नीलपरी
इतकी गडद निळी का होती

माझ्या वातावरणात
तीच पसरते खूप
तिच्या अधीर तोकडेमुळे
आणि माझ्यातल्या पृथ्वीतत्त्वामुळे

पहाटे ती शांत होते
जशी आणखी एक संध्याकाळ
प्रतीक्षेतली लाली असलेली

ती म्हणाली की खरे तर ती जांभळी असते
जेव्हा माझे डोळे तिला निळी म्हणून स्वीकारतात

जाऊ देत ते सगळे तपशील
येत राहा स्वप्नात मी म्हणालो
शून्य आणि सेक्स एकच असते हे समजून
--- ००० ---

नावाचा कागद

आयुष्यात खूप कागदपत्रे
हाताळली काही बाळगली
काही धुळीने बेजार झाली
तर काही नुसतीच
काळ पुढे सरकल्याने
झाली निरर्थक

अगदी न्यूनतम म्हणजे
राहावा फक्त एक
नावाचा कागद
आता कोणताही फॉर्म
नजरेसमोरही नको

नोंदींवर चालणारे हे जग
स्वतः मात्र असे की याची कुठे
ना नोंद ना दाद ना फिर्याद

हे आहे वा होते
हे अंधारातच राहील
--- ००० ---

स्वातंत्र्य

मजकूर सतत
लक्ष्य वाचकालाच
जाऊन भिडला पाहिजे

अन्यथा घडायचे
सतत अपघात
कवीच्या डोक्यात

वैचारिक धोका परवडला
पण स्वप्नातही ठामपणाचे
स्वातंत्र्य सोडणे नको
--- ००० ---

स्वखुशीने

असण्यातले दुतर्फी डावपेच
वगळल्यावर
उरते एक विश्वासगगन

आता गरजच नसते
एकमेकांचे असण्याची
मीलनासाठी

एकमेकांना खरे धरून
पूर्णच जगता येतात
तेवढे उत्तेजक क्षण

दोन्ही खोट्या मनांनी
स्वखुशीने दोन्ही
मनांना अप्रस्तुत करत
--- ००० ---

## सौहार्द

मन जिवंत असेस्तोवर
आयुष्याला मृत्यूकडे
ढकलत राहणे हे त्याचे कामच आहे

सगळ्यांनाच हवीय
आपापली क्रांती
एकमेकांविरुद्ध

सुरक्षा न्याय सौंदर्य
ही मूल्ये खलासच होताहेत
असे सगळेच म्हणताहेत

हिंसा वाईट शांतता हवी
सौहार्दस्थापनेसाठी क्रोध
हवाच यावर कुणाचेही दुमत नाही

--- ००० ---

पानामुळे

पानामुळे पाखरू
डोंगरामुळे समुद्र -- कुणीच
ही माहिती न ठेवता

मनाला कळते
आपण सीमाबद्ध होतोय
आणि त्रस्त

ते म्हणते हवे तर मी त्यागेन
माझे ग्रह आणि आग्रह पण
मला नैसर्गिक जगायचेय असीम

मग ते असीम होण्याची
माहिती जमवत
घडवत राहते स्वतःला निसर्ग

--- ००० ---

स्पर्श

होकाराला फुटते पालवी

जी होते पर्णसंभार

स्वप्नात

गालिबच्या प्रेयसीसारखी प्रेयसी

स्पर्श करताच नाहीशी होणारी

पण इथे तर तिलाही मन आहे

त्यामुळे

तिचे नाहीसे होणे हे आभासी आहे

--- ००० ---

मनात

" तू मला आवडणे हेच
तुझे माझ्या मनात असणे ", तो म्हणतो.
" मला पाह्यचेय ", ती म्हणते.
" ते शक्य नाही कारण
तू मला आवडण्याची तीव्रता
क्षणोक्षणी वाढत जाते --
तू पाहीपर्यंत ते बदलणार --
पण, बघ तरीही -- तेवढा वेळ
तू जवळ तरी राहशील ! " तो म्हणतो.
" माझ्या मनात
तू एक धूर्त आणि डावपेची माणूस आहेस -- "
ती म्हणते. " मला पाह्यचेय ", तो म्हणतो.
" आपण खरे कसे आहोत, कोण जाणे ",
दोघेही म्हणतात !
--- ००० ---

## समारोप

समारोपाच्या वेळी
त्रासदायक होता
सुगंधी अंधार

अंधार जिवंत नसला तरी
बंदपणा हा त्याचा गुण असतो

घडावे असे वाटले पण नाहीच घडले
तसा अंधार

जिवंत नसूनही
मनाला गाठणारा

जणू आता इथून कुठेही जाणे नाही
असा

परतीचा

--- ००० ---

शॉर्ट सर्किट

कोणत्याही पूर्णतेला
आपल्या भूतकाळाचे बंधन
कसे असेल

आपले स्वभाव नाही असू शकत
मीलनाचा क्षण

नुसत्या एका शब्दाने
विश्व झणत्कारते
तेव्हा त्यात कोणतेच देणेघेणे नसते

आधी शब्दच होता
हे खरेच असावे
कुणाचाच नसलेला

नुसत्या आठवणीतून नाही येणार
तुझी कविता

त्यासाठी पुन्हा घडावे लागेल
मेंदूतले ते शॉर्ट सर्किट
एका शब्दातून उडणाऱ्या
असंख्य शब्दांच्या
शब्दहीनतेचे
--- ००० ---

दरी

अशी दरी
की प्रतिध्वनी
किती वेळाने येईल
आणि येईल का मुळात
हेच अनिश्चित

आला तर आणि येईल तेव्हा
तो असतो चेतक

ती अनिश्चित घटना
किती लांबून येईल
की अगदीच जवळून
ते माहीत नाही

कल्पना कंटाळते कोमेजून
सतत वाट पाहण्याने
आणि ठरवते – जाऊ दे --
काही गरज नाही लहरी
आपल्याच प्रतिध्वनीची
--- ००० ---

स्वातंत्र्य

अन्यायाविरोधात
सक्रिय राहण्यात
जाते स्वातंत्र्य जगण्याचे

सूर्य न दिसताच
बोलावे लागते
उद्याच्या सूर्याबद्दल

खोटेपणाच्या विरोधातल्या
अथक कामात अडकतात हात

आक्रमणाच्या क्रोधात
बीपी वाढत जाते

थोडे थोडे बदल घडवा
आणि मधुमेहही कंट्रोल करा
असे जमू लागते व्यवस्थापन

सगळ्यांचेच सगळे
दुसऱ्यांमुळेच घडत असल्याने
स्वातंत्र्याची चळवळ
अमरच राहते

म्हणूनच तर म्हणायचे
माणूस जगूच नाही शकत
स्वातंत्र्याशिवाय
--- ००० ---

अंदाज

तुमचे अंदाज चुकत असले तरी
तुम्ही निर्धास्त असता
क्षणांसारखे तारे
निखळलेले दिसले
तरी तुम्ही विचलित नाही होत

तुमचे विश्व सध्या जरी
मागे पडले असले तरी
तुम्ही काही क्षण निवांत
थांबता

एकेक घटना घडतच चालणार
कुणाचेही आयुष्य नाही तरी
कित्येक घटना वेगळ्याच तर घडल्या
किंवा घडल्याच नाहीत

तुमचा तुमच्या प्रेमावर असतो विश्वास
वाट पाहात नसल्यासारखे राहात
तुम्ही निर्धास्तपणे क्षण
जाऊ देत राहता एकामागोमाग एक
--- ००० ---

## हळूहळू धुमसत

कामात नसतील तेव्हा जगात
कोट्यवधी माणसांची नजर
एकटक असते अधांतरी

खूप वेळ दिला म्हणजे
उत्तर मिळून सुटका होईल
याचा हजारदा फसलेला
तो खेळ असतो

शरीरातल्या नाजुक जागी
याचे ताण साठून
माणूस आजारी होतो

काहीच अंतिम उत्तराला
पोचले नाही तरी
तसे पोचण्याची शक्यताच
त्याला सेफ वाटते

त्याच्या मेंदूला
एकेका प्रश्नावर
हळूहळू धुमसत
जळत राहायची सवय लागते

--- ००० ---

## शोध

घाबरून मी आळशी होतो
आणि पुन्हा सुरू होते
मनाचे विघटन

याचा दोष
निसर्गाला नाही देता येत
औपचारिक म्हणजे औपचारिक
पोषाख माझे ठरलेले असतात

विघटनातच असते माझी ओळख
तिच्यासाठी
मी नष्ट व्हायलाही तयार असतो

तरीही
शांततेचा शोध घेणे मला आवडतेच

--- ००० ---

## माहितिभांडार

कुठे काय ठेवलेय
हे आवरून आटोपशीर केले तरी
महिन्याभराने आठवणे शक्य नाही

किती विद्वान असतात लोक
एकेका लेखात पन्नास पन्नास संदर्भवाले
याच्या नुसत्या विचारानेच
जिन्यावरून घरंगळत वेगाने खाली जातात
माझ्या आत्मविश्वासाच्या छोट्या छोट्या गोट्या

खूप माहितियुक्त बोलतात मित्र
उगीचच आणि निरुपयोगी

गरज असलेले थोडे
आणि गरज नसलेले शून्य
अशा फ्रेश मनाने वावरतो मी जगात
आणि माझे आणि जगाचे भागून जाते

माझ्यासारखाच थोडाफार न्यूनगंड
सगळ्यांनाच असणार हे मी धरून चालतो
मी थोडाफार मागे पडत असलो तरी

मला काही कळतच नाही तर माहितिभांडार
माणसाचे मी करू काय आयुष्यात

मी अथक निवांत राहतो

--- ००० ---

## जादू

एकटेपणा तर
माझ्या पाचवीला पुजलेला आहे
दहाव्यालाही असेल

मी वाटच नाही पाहात
वाहतूक-कोंडी सुटण्याची
मला आवडतोच एकटेपणा

एकटेपणातूनच येते कविता
आणि एकटेपणावरच हल्ला करते
हीच तर आहे एकटेपणाची हवीशी जादू

--- ००० ---

## किंचित ऊन

कुंद हवा
बाष्पगारठा
हा स्थायी भाव
आणि बंद श्वास
हे दुःख

झाडे संवेदनशील
पण यात कृतीची
बंदी असलेली

किंचित ऊन मात्र
कुरवाळते
--- ००० ---

## अर्थ आणि हेतू

माझ्या कवितेवर
मी नाही लादत
माझेही अर्थ

खरे तर कविता
नसतेच माझी
शब्द माझे असूनही

तशीच ती वाचली गेली
तर हीच कविता उगवेल
कुणाच्याही मनात

पण मानसिक अर्थ
नसलेल्या अशा कवितेचा
तो हेतू नाही असू शकत

--- ००० ---

निसर्ग

जेव्हा झाडे
जागच्या जागी जाऊन बसतात
समुद्र खुश होतो आणि
आकाश आणि छाती मोकळी होऊन
सर्दी जाते तेव्हा
कळतेच की हेच बरोबर आहे
तरीही
काही होण्यासाठी आणि
काही बदलण्यासाठीची माझी धडपड
जिवाचे हाल करत बनते ध्येय
त्यामुळे पराभवाने मी हवालदिल होतो

तरीही
तो मृत्यू परवडला पण हा नको
असे म्हणतही मी निसर्ग लाथाडतो
--- ००० ---

लगदा

होय अक्षरशः शारीरिक
लगदा करता येतो
भूतकालीन आणि आत्ताच्या
सर्व विचारांचा
आणि देता येतो फेकून आकाशात
मस्त फ्री होत
न दिसता जाणवत

मग ते विचार कसा काय
माझा अटळ भाग असतील

जरा दुर्लक्ष होताच क्षणात
ते जाऊन बसतात पुन्हा जागच्या जागी
आणि पिरगाळू लागतात
स्नायू पेशी आणि मेंदूकण

मी त्यांना मी समजण्यापेक्षा
तेच मला ते समजतात
--- ००० ---

ठळक

जगण्याचा साईड इफेक्ट
म्हणून ग्लानी येते
मी हलकेच हळूहळू जेवतो
मग हात धुऊन येऊन खुर्चीत बसतो

या जगात निवडून येऊन उपयोगच काय
जे घडेल ते धारदार आणि स्पष्टच
घडणार नसेल तर

मी ठरवलेले सगळे ठळकच असायला हवेय
माझे दिवास्वप्नही जर धूसरच असणार असेल
तर मग झोपीच गेलेले काय वाईट आहे

भूजल पातळी कमीजास्तच असणार
असे म्हणणे म्हणजे उडवाउडवीच झाली
--- ००० ---

वेगळा

त्याच्याकडे ५९७ आहेत
देशोदेशींच्या निसर्गफोटोंचे
अपवादात्मक आल्बम्स

तो म्हणतो निसर्ग जसा
तसेच हे फोटो
आता माझ्यापुढे मूळ नाही
पण हे आहेत

अतिसुंदर, अद्भूत, चमत्कार
म्हणावेत असे मन
आकर्षून मग्न करणारे

त्याला स्वप्नेही
अशा उत्तेजक
दृश्यांचीच पडतात

खरेखोटे काहीही असो
तो म्हणतो
मी वेगळा आहे

हे टिकावे
म्हणजे बास
--- ००० ---

## इच्छा

जणू माझी इच्छाच
तू बनून आली

जणू तुलाच
मला नष्ट करायचे होते

जणू माझी दृष्ट लागून
तुला जळून जायचे होते

जणू माझ्या ऐवजी
तूच फक्त तुझीच इच्छा

--- ००० ---

## शांतता

खूप बोलायचे आहे
म्हणायचे
पण काहीच बोलायचे नाही

माझ्या ऐवजी
तुझी शांतताच बोलेल
म्हणायचे

--- ००० ---

## जाच

काही वर्षे
मी हरवलो होतो
हस्तरेषांच्या जंगलात

त्यांच्या घटनांबाबत
नव्हती मला शंका
त्याच तर होत्या
माझ्या मनाचे जंजाळ

मन सगळेच खरे धरू लागल्याने
जगण्याचे नुसतेच रूटीन झाले
सुखदुःखांचे

हातावर हात घासून
पुसल्या कुठे जातात त्या रेषा

रेषांचा जाच असह्य झाला
मन नाकारायचे कसे ते समजेना
रडू आले

--- ००० ---

सेफ

कित्येक जातयेत असतात
समोरून वा आजूबाजूने
इच्छाही असते ऐकीव सामानातून
की असावा हा स्पर्श जगण्यात

पण चालू राहते
मनाचा रोजचा चहा
रोजच्या मगातून पिणे

जवळीक म्हणजे धोका
आणि अंतर म्हणजे सेफ्टी

हे पाहून कविता स्वतःच
एकदा चुकून त्याला म्हणते
राहा बाबा तू सेफ
कविता खुनीच असते
--- ००० ---

समता

मुंग्यांनी गाढवांचा द्वेष केला
गाढवांनी उंटांचा
कारणेही होती
कधी या टाळक्यांना पटणारी
कधी त्या

कधी हिंसेचे समर्थन
कधी अहिंसेचा गौरव
असे नैतिक आणि शिस्तबद्ध
चालू राहिले जगणे
अविचल

सर्वच माणसांत
ही एक समताच आली
--- ००० ---

खच

इतिहासासह संस्कृतीचे
अचूक ज्ञान नसेल तर
वर्तमान धूसर आणि
भविष्य अंधारमय असते

हे त्याच्यावर बालपणीच
बिंबवण्यात आले
त्याला तो जागला

वर्तमान कष्टमय करत
तो ९९ वर्षे जगला

सारांश इतकाच निघाला की
शतकाला एक वर्ष कमी पडले

त्याच्या घरातला पुस्तकांचा खच
काढायला बुलडोझर आणावा लागला
किंवा समजा ५०० मजूर --
--- ००० ---

धागे

अनेक दिशांनी ओढले जातात
मेंदूतले धागे आणि
इलाज नसलेले मोबाईल
सत्यनारायणाच्या
लाऊड आवाजातही
निर्दय तटस्थपणाने
न थांबणाऱ्या ओकाऱ्यांसारखे
सतत चालू राहतात

परिस्थिती एका क्षणात
बदलावी असे वाटते
पण अनेक माणसांसह
अनेक घटना त्यासाठी आवश्यक

घटनांचे जग हे असेच असणार
मग मला काय हवेय
--- ००० ---

## आध्यात्मिक

सवयीच्या स्वार्थासाठी
आपद्धर्माने कधीकधी
त्यागही करावा लागतो

प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून
तिकिटाशिवाय नेटाने
प्रचार करावा लागतो

पक्षनिष्ठाच बरी पडते
परक्या चोरापेक्षा
ओळखीचा चोर सेफ वाटतो

मन फाटले तरी
हसावे लागते
श्रेष्ठींचे माहात्म्य मानावे लागते

निराशा अपमान असूनही
वैज्ञानिकपणे
आध्यात्मिक व्हावे लागते

--- ००० ---

ते काय

अनेक अनुभव आणि कालच
रात्री मी त्यांच्याशी बोललो होतो
आणि निसर्गाच्या नादी कोण लागणार हो
आणि दुःख आणि मस्ती
आणि खूप खूप आळस किंवा
खूप खूप उत्तेजना
हे सगळे दिले अनेक कवितांनी

माझ्या मनाने ते स्वतःची
कृतिशीलता म्हणूनच वापरले
आणि स्मृती वाढली आणि चेहरा थोडा
प्रगल्भ झाला
आणि वेळही आवडीने गेला

तरीही महत्त्वाचे काही घडायचे राहिलेच
असे आता वाटतेय आणि आता

ते काय हे दाखवणारी कविता हवीय
--- ००० ---

दया

कुणीही असो माणूस
त्याला एक तर वठणीवर आणला पाहिजे
किंवा मापातच ठेवला पाहिजे चेपत
असे वाटते काहींना

गरीब स्वभावाचा दयनीय माणूस वगैरे
असे काही नसते सगळे साले
स्वार्थीच असतात शेवटी भोसडीचे
असे ते म्हणतात

दयेने वागलो तर मी लागेन भिकेला
माझ्याशी वागेल का कोण दयेने
असे ते विचारतात आणि
माणसाकडे बघायचेच नाही म्हणतात

शेवटी अशा वेळी दयनीय माणूस अधिकच मऊ पडतो
किती क्रूर बनवलाय याला
याच्या आयुष्याने आणि माणसांनी जसा मला दयनीय
असे मनात म्हणत तो एकदा शेवटचा त्याच्या पाया पडतो

--- ००० ---

फूट

जरा टफ हो ठाम हो
असे मी अ ला सांगणे
हे ब ला दुखवणारे ठरू शकते
-- तोही माझा मित्रच असल्याने

आम्हा तिघांनाही एकमेकांपासून
काही साधायचे असते आपापले

वेळ अशी येते की
अ वर अन्याय होऊ शकतो --
मी त्याच्यावरच राग दाखवून
तात्पुता बाहेरच पडतो
-- सर्वांच्या हितासाठीच मी रागावतोय
हे सर्वांना कळते

अ आपोआपच जरा टफ होतो
ब त्याचा पवित्रा जरा मागे घेतो

माझ्या सौम्य रागामुळे अजूनही
तिघांचीही उद्दिष्टे
शाबूत राहणे शक्य होते

फूट न पडता

--- ००० ---

पक्षी

आपण कसे दिसू
कसे वाटू
एखादे वैगुण्य तर
दिसणार नाही ना

हा विचार म्हणजे
एक भविष्याचा हिंसक पक्षी
पायांच्या नखांत पकडून
हृदयावर चोच मारणारा

वर्तमान क्षण हजर होताच
भस्मसात होणारा
--- ००० ---

धावा

मनाचाच मनालाच
त्रास असह्य झाल्याने
शांततेचा धावा
मनच करते
आणि अधिकच अशांत होते

आपणच थांबायला हवेय
हे त्याला कळूनही वळत नाही
--- ००० ---

आडमार्ग

हा आडमार्ग आहे हे माहीत असूनही
मी समजा तो महामार्ग समजूनच चालतो
-- जाऊ द्या ना वापरता येतोय तसा तर तो
असे इतर लोक सैलपणे म्हणतात

न पोहता माझे शरीर
पैलतीराला लागते
असेच दिसते माझ्या
मानलेल्या विश्वासामुळे

आडमार्गावर चालणे
हे अतिकष्टपूर्वक
पोहणे असते माझे
सरावाशिवाय
--- ००० ---

मालकी

ऊन पडले – चालेल

पाऊस पडला – चालेल

अंधार पडला तरी चालेल

असा जगशील

अट्टहासाशिवाय

तर तुझे काहीच नाही असणार

ऊन पाऊस वा अंधार

तू आपला

चारा खा पाणी पी

आणि भुर्र कन उडून जा

तू आहेस तोवर

मालकी गाजव

वेड्या

--- ००० ---

नवे जगणे

वयाची पंच्याहत्तरी आली
तरी तो अमुक मोठ्याचा वंशज
असाच सगळीकडे वावरे
चेहऱ्यावर तोच मोठेपणा बाळगत
न कंटाळता
जणू ते मोठेपण
हे त्याला जन्मजात मिळालेले
एक उत्तेजक द्रव्यच होते

इतिहासातले दाखले तर
त्याच्या हातापायांसारखे
त्याचे अवयवच होते

त्याच्या दोन्ही मुलांनी मात्र
बंड करत हा कंटाळा नाकारला
दोघेही अट्टल दारुडे झाले

तो मोठेपणा गेला तेल लावत
आम्ही चेहरे सामान्यच ठेवणार --
असे नवे बेडर जगणे त्यांनी अवलंबले
--- ००० ---

राजकारण आणि कला

तुम्हाला राजकारणाची आवड असो की कलेची
मेंदू त्यात सतत भिजत ठेवावा लागतो
म्हणजे तुम्हाला भराभर मते देता येतात
संदर्भ आठवतात
आणि इतरांना नामोहरम करता येते

राजकारणात सध्या काय महत्त्वाचे
किंवा कवितेची खरी मूलतत्त्वे कोणती
असे बोलता येण्याचा एक वेगळाच
आत्मप्रौढ आनंद असतो

लोकांना चकित आणि नम्र करून घेण्यासाठी
एवढी मेहनत तर लागणारच
शिवाय मानवतावादासाठी
काम करत असल्याचे समाधान

--- ००० ---

विश्वासघात करण्यापेक्षा

काही प्रतिमा होऊ नयेत
विचलित माझ्याकडून
म्हणून मी माझी खरी प्रतिमा लपवतो
आणि त्यांना सेफ वाटेल अशी
त्यांना अपेक्षित प्रतिमा बाळगत राहतो

माझ्या खऱ्या प्रतिमेने
त्यांनी दुखावले जाणे म्हणजे
त्यांच्या असण्यालाच तडे जाणे

मी स्वीकारार्ह नसणे मला मान्य
असूनही मी त्यांची सेफ्टी पाहतो

त्यांचे खरे काय आहे हे न समजताच
मी राहतो प्रयत्नात
माझी स्वीकारार्हता टिकवण्याच्या

माझ्या स्वीकारार्हतेला तडे गेलेले
खरे तर मला चालणार असते
पण त्यांच्या जखमी होण्याच्या
शक्यतेला मी घाबरतो

मी अमुक असा नाही
असे त्यांना प्रेमाने आणि विश्वासाने वाटते
-- विश्वासघात करण्यापेक्षा
मी फसवणूकच चालू ठेवायचे ठरवतो
--- ००० ---

साधे गोड

मनाला आवडेल
असे साधे गोड काही
हवेय कवितेत
या विचाराने समोर
प्रेयसीची कल्पना केली

भांडणे खटके
काहीही झाले तरी
आपली साथ आहे तशीच राहायला हवी
ती म्हणाली

तसे झाल्यास
असे कशासाठी – मी विचारले

काहीही झाले तरी आपली साथ
आहे तशीच राहिली असे म्हणता येण्यासाठी
-- ती म्हणाली

झाले
उद्युक्तच व्हायला झाले

कशाला त्या भविष्याच्या कटू कल्पना
या विचाराने
--- ००० ---

## बुद्धाचे शब्द

मनमानी कारभार
हेच तर माझ्या जगण्याचे वर्णन

दुसरे आहेच कुठे काही
जगण्याचे साधन

कसे आहे जग कोण जाणे
मी घेतो करून माझे पावन

मीच सत्य बाकी सर्व असत्य
माझ्या दुःखाचा बरसता सावन

बुद्धाचे शब्द पोतडीत भरून
करतो मी माझी अव्याहत वणवण

--- ००० ---

## शिंका

सकाळी मी बाहेर पाहतो
खिडकीतून तर मला दिसते
सूर्योदयाऐवजी कुंद हवा
आणि येतो मनात विचार
जगण्यातल्या अनिश्चिततेचा

जग काय सगळे माझ्या बाबतीत
घडण्यासाठी थोडेच असते
ही शंकाही डोक्यात असूनही
मी आरोग्य विम्याचे नक्की करतो
निष्कारण भीतीची दखल घेत

काहीच निश्चित नाही तर जाऊ देत ना
हे पैसे वाया त्याच जगात --
मला शिंका याव्यात म्हणून
कशाला एवढे मोठे जग
झक मारत बसेल

--- ००० ---

## लुप्त

अशी एक प्रेमकहाणी
जी भविष्यात होऊ शकते असह्य
काहींसाठी

आणि त्यामुळे राहते लुप्त
आज आणि रोजच
जणू घडलीच नाही अशी

--- ००० ---

प्राथमिक समजणे

शेकडो प्रकारचे कवी
आणि महागुंताड्याचे कादंबरीकार
कशाला हवेत
फक्त
काही समजू नाही शकत
हे समजायला

आणि समजा शकते समजू
तर कितीही
हे थोडेच ठरणार
इतके की न समजणेच ते

न समजण्यापेक्षा
समजण्याला महत्त्व देणे
हे कधीही नुसते
ढोर मेहनतीचेच असणार

हे प्राथमिक समजणे तर हवेच
--- ००० ---

आहेच कोण

धावा वा कृतज्ञता
ऐकायला वा स्वीकारायला
आहेच कोण

याचना वा उपकार
यांची सवयच झालीय
या हिंसक जगात

हाक मारते वा पाया पडते
ते निव्वळ माझे क्षुद्र मन
भिंगुळवाणे
--- ००० ---

काही शाब्दिक नोंदी

त्या त्या वेळचे
भयानक भावनिक डोळे
आता झालेत फक्त
काही शाब्दिक नोंदी

आणि काही मेंदूंत
सूडाची सुप्त चक्रे

समोर निसर्गात वा शहरात
दिसत नाही कोणतीच खूण

जे घडेल ते दिसेल
निरुपद्रवी
पण शूर निधडी मने
संधी मिळताच
पुन्हा उचल खातील
--- ००० ---

आविर्भाव

माझी क्लॅरिटी
असू नाही देत मी माझ्या जगण्यात
अनेकदा पुन्हा पुन्हा व्यसनाकडे वळत

माझ्या घरासमोर
रोज उभ्या राहणाऱ्या
एका खाजगी बसचे वर्णन करत
मी अनेकदा वेळ मारून नेतो
किंवा माझ्या सखोल औदासीन्यालाच
देत शोकात्म अभिव्यक्ती

वाचकांना वाटते
मी त्यांची फसवणूक करतोय

ते खोटे तरी कसे म्हणणार
एखादा आविर्भाव
मी सत्य म्हणून सादर करत असताना
--- ००० ---

## टप्पा

त्यांच्या आयुष्यांतल्या घटनांनी
ते खळबळीत जगतात
आणि मलाही फिक्स करतात
माझ्या सनसनाटीपणात
त्यांच्याशी मी
समरसतेने वागत गेल्याने

काहीच नसते तेव्हा मीही जातो
त्यांच्याबरोबर एखाद्या रहस्यपटाला

खून कुणी केला
हे एकदा समजले
की आम्ही पुन्हा सज्ज होतो
एकेक टप्पा पार करायला

--- ००० ---

भेट

कितीही वळणे झाली
कितीही काळ गेला
तरी भेट होतेच तिची
जेव्हा अचानक मलाही नकळत
मी नाहीसा होतो

मग नंतर ती भेटावी
म्हणून तडफड होत राहते
आणि कळते
अशाने मी नाहीसा नाही होऊ शकणार

ती कधीही भेटायला तयार असते
एका अटीवर --
ती भेटावी या हेतूने
मी नाहीसे व्हायचा प्रयत्न करता कामा नये

ती सार्वभौम असते
बिनशर्त
माझी कविता
माझी असूच न शकणारी
--- ००० ---

## शब्द

प्रतीक्षित शब्द येणारच होते
पण तेवढ्यात काळ थांबला

तेच शब्द आता
माझ्याच मनातून येऊ शकतात

आणि अर्थातच
अपेक्षित ठिकाणी ऐकू जाऊ शकतात

ना स्वप्नाची गरज ना सत्याची
एकमयतेतूनच तर येणार ते शब्द

--- ००० ---

## गालिब

असण्याला नसण्याचा
दुरावा असह्य होणे
आणि असण्याला
असण्याचा दुरावा
असह्य होणे
हे दोन्ही मिळून
घडते गालिबची कविता

त्याला सलाम ठोकताना
आपलेही नसणे घडून जाते
आणि आपल्याही असण्याला जडतो
असह्यतेचा रोग
हवासा

--- ००० ---

प्रतिमा

माझ्या मनाला
हे फुटकळ वाटावे
अशीच योजना असेल
माझीच

आता आटोपते घ्यावे
वेगळ्या कामासाठी
इथून मुक्काम हलवावा

सगळेच काहीही कसेही
असणार आहे
कदाचित उपेक्षितही
हे ओलांडूनच
निघून जावे लागेल
या जगात पुढे काय व्हावे
याची कल्पना न करता

सगळ्या प्रतिमाच तर आहेत
त्या कशाही असोत
आणि त्या असल्या काय
आणि नसल्या काय
--- ००० ---

साळुंक्या

झाडे अस्ताव्यस्तच असणार
हे अनेकदा न समजल्यामुळे
अस्वस्थ झालेल्या साळुंक्या
शहरातल्या घड्याळाभोवती
घिरट्या घालत राहतात

काही कवींनी त्यांच्यावर
कविता लिहिल्या होत्या
परागंदा होण्याच्या
हे कायमचे गोंदलेले असते
त्यांच्या मनांत निळ्याभोर

पण मुख्य मुद्दा वेगळाच होता --
त्याच कवींना स्वतःतल्या विकृती
व्यक्त होण्याची भीती होती आणि सतत
त्या भीतीचे त्यांना टाईट ब्रेक होते

आणि ते म्हणत की सेन्सॉर नको
आणि स्वातंत्र्य हवे

तेव्हापासूनच हळूहळू
साळुंक्यांच्या चोची पिवळ्या होत गेल्या
आणि कवी संभावितपणे
त्यांना शुभशकून म्हणू लागले
--- ००० ---

## माझा धोबी

अत्युच्च दर्जाच्या उंची गोष्टी
निसर्ग माझ्यासमोर आणतो
पण मनुष्यनिर्मित उंची वस्त्र
मला माझे नाही वाटत
सवयीच्या अभावाने

मी ओशाळतो आणि अस्थिरतो --
माझा धोबी नुसता हसतो पाहून

निसर्ग आणि माणूस
वेगवेगळे असणे
ही कुणाची निर्मिती
मानसिक

--- ००० ---

सांगाडे

उदार अंतःकरणाने जाळलेल्या
अविरत कचऱ्याचा धूर फुफ्फुसात
घेऊन भर गांधी रस्त्यात
देहधर्माची घाई व्हावी
आणि जवळपास कुठेच नसावे
एखादे कार्यालय आळसावलेले
तशी अवस्था घेऊन

असंख्य अस्मितावाले बेरोजगार
शताब्द्या साजऱ्या करण्यात व्यग्र

लग्नसमारंभात हजर राहून
कुर्निसात करतात
पुढे गेलेल्या पुढाऱ्यांना
जातिनिहाय फॉर्म भरत

तबकात ठेवलेल्या सिगरेटस
त्यांना उपयोगी पडतात
द्वेष फुलवायला
जगण्याचा पायाच समजून

आणि झगमगीत कपड्यांतले वधुवर
भासतात त्यांना
त्यांचेच पाचशे वर्षांनंतर
सापडलेले सांगाडे

--- ००० ---

निऑन साईन्स

विश्वसनीय वाटायचा प्रश्नच नाही
अशी सर्व शाळांवर निर्दयपणे
धडकणारी वादळे
कधीच घेत नाहीत जबाबदारी
तुमच्या लैंगिक संबंधांतले तिढे
सोडवून तुमची प्रमोशन्स
नक्की करण्याची

तुम्ही अनुभवातून शिकणारे पंडित
तुम्हालाच उद्देशून म्हणतो तुकाराम
अहो पंडितजन
तुका टाकावा थुंकोन

आता तुम्हीच ठरवा
संभोग महत्त्वाचा की शिक्षण

तुमची मने तडफडत ठेवत अबाधित
प्रोत्साहन देत राहणारी
ही हॉटेलांची निऑन साईन्स

तुमचे खिसे कापून
तुम्हाला कंगाल करत आहेत
हे तुम्हाला माहीत नाहीय का
--- ००० ---

उपयोग

आपल्याला हा रस्ता
फाडायचाच नाहीय
उपयोग होऊ शकतोच त्याचा
पण याचा अर्थ असा नाही की
तुम्ही वा मी एकमेकांना विदूषक म्हणावे
किंवा आपापल्या गावांच्या नावांवरून
एकमेकांच्या प्रवासांचे अंतर ठरवावे

मी कविता लिहितो तेव्हा
ती वाचणाऱ्याचे रंगरूप
वा त्याचे घराणे
यांच्या माहितीची मला गरज नसते

मी फालतूच आहे
माझी कविता वाचताना
माझे मूल्यमापन द्या फेकून

वाटल्यास नंतर
माझी कविताही द्या फेकून

प्रत्येक उपयोगी गोष्ट
मतांच्या पसाऱ्यात व्यग्र असते
कविता तरी निदान निरुपयोगी राहू द्या
--- ००० ---

चहा

पाच मिनिटांत इथून
रुग्णवाहिका जाईल
असा अंदाज कसा करणार --
पण जाईलही
तिकडे आणखी काही काही
हजारो गोष्टी जुळून घडल्या तर

कुणी चहा पिऊन जा म्हटले
आणि थांबणे केले नाही
म्हणून अपघात झाला
किंवा टळला
असे कसे म्हणणार

झटका येतो तो क्षण
लाखो क्षण जगून झाल्यावरचा
नेमका क्षण असतो
लाखो कारणांनी जमून आलेला

मांडलेला इतिहास
ही जशी ओळख नाही असू शकत
तशीच एकूणच स्मृती हीही

साधाच नमूना म्हणजे
चहा
ही कुणाचीही ओळख कशी असेल
--- ००० ---

## सहवास

कंटाळून वैतागून गेलेले असाल
तर मनाला वय असते
कारण ते प्रेम नाही करू शकत

तुम्ही प्रेम करता याचा अर्थच
तुमचे मन तरुण आहे

नुसती आठवणही
सरसावते जणू कार्यतत्पर
अथक वयातीत समोर

भूतकाळात जखडले गेले मन
की संपलेच
मग गेलेली वर्षे कितीही कमी असोत

प्रेम म्हणजे वर्तमानात
ओसंडून असता येणे

सातत्याची भीक न मागता
आणि सहवास
आभासी की सत्य हे न विचारता
--- ००० ---

अंतर

मला माहीत आहे
माझे मन अंतर कापू शकते

आठवण येते
हा माझा दोष कसा

तिकडे दूध उतू गेले
ते माझ्या मनामुळे नाही

--- ००० ---

बरेच काही

तुझा विचार मनात घेऊन
मी बरेच काही पाहिले –

खिडकीतून दिसणारा रस्ता
स्कूलबस
लांबचा डोंगर
आकाश
मग पुन्हा रस्ता
मग टेबलावरची डायरी

मग पक्षी ऐकले
आणि मग शेवटी

बराच वेळ काहीच केले नाही

तो विचार हेच जगणे झाले

आणि मग एकाकीपणा आला
--- ००० ---

जे गेले ते

चिमण्या गेल्या आणि त्यांची चिवचिवही गेली
हल्ली बेडूकही नाही ऐकू येत पावसाळ्यात

माणसांचे मॉल्स
जातवादाने सुजलेले
आणि विचारांनी तडकलेले
त्यांच्या मनांचे अवकाश

यातच कला आणि संस्कृतीचे गोडवे
स्वतः कलावंतही
त्याच सवयींत रमणारे

जे गेले ते गेले
त्यांचा इलाज नव्हता
तेव्हा निसर्ग बोलला नाही

गेलेल्यांची मूक अनुपस्थिती
आणेल जो परिणामांचा प्रलय
तो ना द्वेष असेल ना सूड

तो असेल निसर्गाचा
आपोआप न्याय करणारा
शांत आवाज

--- ००० ---

त्या वेळी

भूतकाळात तीन वेळा संधी होती
त्या वेळी असे घडायला हवे होते
पण त्या ऐवजी वेगळ्याच गोष्टींना महत्त्व दिले गेले
तात्पुरते मार्ग म्हणून हे ते केले गेले
त्यामुळे हे नाराज झाल्याने
या अशा दोन गोष्टी कराव्या लागल्या

जोवर आपण हे असे करणार नाही
तोवर हे असेच घडत राहणार
मूळ प्रश्नाऐवजी
दुसरेच काही महत्त्वाचे ठरणार
आणि मग पुन्हा कुणाचीतरी नाराजी घालवण्यासाठी
वा कुणालातरी खुश करण्यासाठी
तात्पुरते काही घडत राहणार
आणि कायमची निराकरणे तर निघणारच नाहीत
उलट असेच आणखीही प्रश्न उद्भवत राहणार

विचारात कसे बदल हवेत हे आपल्याला समजते
पण एवढ्या मोठ्या लोकसंख्येची मने कशी बदलणार

आणि हे आज नाही झाले तर भविष्यात हेच म्हणावे लागणार
की त्या वेळी हे असे घडायला हवे होते
म्हणजे आज हे प्रश्न राहिले नसते
--- ००० ---

## जगणे

कितीही वेगवेगळे असोत वा विरुद्ध
सगळेच बरोबर असतात
जरा जोरात ओरडावे लागते
आणि थोडाफार भूतकाळ
आरोपांसाठी वापरावा लागतो

या सगळ्यासाठी घटना
घडत राहाव्या लागतात

रस्त्यात अपघात घडल्यामुळे
रस्ता अडतो जॅम होऊन उशीर होतो

उशिरामुळे आणखी काही घडते
जे घडते ते तेवढेच नाही घडत
मनाच्या तीव्रतेतून त्याचे अर्थही घडतात

युद्धाचे प्रसंगही
या एकास एक जोडून येणाऱ्या
घटनांसहच येतात

हे सोडता नाही येणार
खूप हिशोब चुकते करणे
घडत जावेच लागेल

त्यातूनच असेच आणखीही काही काही
जगणे घडत राहील

--- ००० ---

## वाफ आणि दगड

वाफ होण्यापेक्षा दगड होणे
कधीही चांगले
दगडात शिरून कुणी
फिरू नाही शकत आरपार
आणि आब राहतो

चेहरा जरा पॉलिश्ड ठेवायचा
आणि मंद स्मित करत बोलायचे
म्हणजे अंतरंग गुप्त राहिल्याने
लोक अधिकच प्रभावित होतात
आणि एकाच वेळी तुम्हाला
पारदर्शक आणि धूर्तही म्हणू लागतात

गैरसमज पसरवायचे
आणि नंतर त्यांतले हवे ते वापरायचे
असे केल्याने तुम्हीच
जग हाताळत आहात असे अनेकांना वाटते

राहायचे दगडच
पण आपण वाफ आहोत असे भासवायचे
त्यामुळे खूप काही उलटेसुलटे घडते
आणि पाहणाऱ्यांचा आदर वाढून
ते तुम्हाला अगाध जाणते समजू लागतात

काही वर्षे असे चालले
तर तुम्ही एक अद्वितीय चमत्कार बनता

--- ००० ---

## घर

हे एक घर आहे
अगदीच बंगला नाही
पण समूहातले घर
जरा बरे

इथून बाहेर पडणारे किरण
घाबरणारे लोकांना
म्हणून बंदिस्त

मुळातच प्रतिमा फुटकीच आहे
ना स्वस्थता ना नीटपणा
तरीही बदनामीची
आणि अधिकच फुटण्याची भीती

लोकांना घाबरण्याचे बंधन जणू एखादे पाप
लपवत असल्याप्रमाणे असले तरी
सुरक्षा प्रदान करणारे

पराभव स्वीकारलेले
म्लान आणि जणू
उत्सुकताच संपलेले घर

--- ००० ---

माणुसकी

रेटून धरल्याने एखादे किरकोळ कारण
नाइलाज होऊन ढग निरर्थक होतात
हिंसेचा आरोपही न करता
कबूल होतात रस्ते त्यागाला
त्यांच्या चकचकीत पदपथांच्या

कशामुळे काय झाले
याच्या सतत विश्लेषणाची आवड असलेले
शुभ्र बगळे मागतात तंदूर मासे

आता हाच मार्ग हे समजून
मोठमोठे विद्वानही
प्रतिबिंबे हीच महत्त्वाचे प्रश्न आहेत
असे समजून अधिकच प्रामाणिक होतात

माणसे यात न्यायअन्याय ठरवत
दुःखाला तयार होतात
माणसाच्या जगण्यात माणुसकी
असायलाच हवी असे म्हणत

--- ००० ---

## प्रतिमा

मी स्वतः तर आहेच एक खोटी प्रतिमा
आणि त्याही तशाच आहेत
पण आता माझे खोटेपण
मी कबूल नाही करू शकणार
कारण
त्या माझ्या खरेपणावर अवलंबून आहेत
स्वतःला खऱ्या समजत
जरी मला स्पष्टच माहीत असले
त्यांचे खोटेपण

आमच्या प्रतिमाच जणू
आम्हाला काबीज करतात
आमचे खरेपण सिद्ध करत
अबाधितपणे

--- ००० ---

चुरा

दगडाला झाड का आवडते
आणि समुद्राला पाल का आवडते
यांचे विश्लेषण कधीच
शेवटाला जाणार नाही
आणि सत्यालाही पोचणार नाही

धूर आहे की धुके
हे कळले तरी
संपादक दोन्हींच्याही
शीर्षओळी करू शकतात

इकडे वाद अत्यंत प्रामाणिक
आणि मानवतावादीच असतात
आणि तिकडे मधमाशा आपल्या
आपापल्या कामात व्यग्र असतात

याला फक्त तात्पुरता शेवट असतो
दोन सूर्यांतला एक सूर्य
चुरा होऊन मातीत कोसळणे
हा
--- ००० ---

अंत

मी कधीही होऊ शकतो
माझा अंत
पण हे बोलण्यात अर्थच नसतो
कारण
अंत म्हणजे काय
हे पोचूच शकणार नसते
कुणालाही

दुसऱ्या व्यक्तीच्या मनात
असणारा मी मात्र
याने नाही होत बाधित
-- मलाही तो तसाच
अमरच राहावा असे वाटते

माझा अंत घडतो तेव्हाही
तो असतोच तिथे
आणि चालुच असतात
त्याचे कार्यकलाप

माझे नष्टत्व घडताना
ती व्यक्ती आणि तीतला मीही
होतो नष्ट

त्याला आणि त्या व्यक्तीला
न कळता
--- ००० ---

## स्प्रे

अनिर्बंध पसरलेले
बाजारांचे जंजाळ
आणि संगणकावरच्या
अनेकानेक फायली
हव्यात-नकोत
हे न ठरलेल्या

हे सर्व नष्ट करायला हवे
नकोच ते निष्कारण ओझे
असा विचार करून
एक स्प्रे आणला
आणि मारला सगळीकडे
जिवाच्या आकांताने

नंतर पाहिले तर
आता जग फारच थोडे उरलेले होते

हे कसे काय उरले म्हणून चौकशी केली
तर समोर दिसलेला
एक फाटका माणूस म्हणाला
आता उरलीय ती फक्त तुझीच
तुझ्या मरणाची भीती आहे

--- ००० ---

डिस्चार्ज

अव्यापारेषु व्यापार म्हणून
हृदय शस्त्रक्रिया करण्या ऐवजी
डॉक्टरांनी पेशंटच्या हातात
तीन पत्ती दिली त्या बदल्यात
चहा पत्ती देऊन ओकला तो
त्याच्या घशात अडकलेले सूर्य

इथूनच सुरू झाली ती प्रेमकहाणी
बेडशीट आणि युरीन पॉट यांच्यांतली
आणि ती पोचली एका अंधाऱ्या प्रदेशात
लैंगिक तीव्रतेच्या अनवधानात

इस्पितळाची इमारत पाहून वाटे
की हे एक वस्तुसंग्रहालयच असावे
दाराशी तीरकमठा घेतलेला
एक आदिवासी उभा पाहून

जोरदार पावसामुळे पुन्हा एकदा रस्त्यात जेव्हा
कमरे एवढी साठली आणि तुंबली स्वप्ने
तेव्हा डॉक्टर पुन्हा आले आणि म्हणाले
“ सर्वजण व्हा बाहेर पेशंटस आणि त्यांचे नातेवाईक
आता इथे खेळली जाणार आहे एक सर्कस
आवडीनिवडींची रक्तात गुठळ्या झालेल्या आठवणींच्या
अजिबात पर्वा न करता कुणाच्याही लैंगिक विकृतींची “

पेशंटसना तो डिस्चार्जच वाटला

--- ००० ---

ग्राहक

खरे तर विल्हेवाट लावायची होती
पाण्यावरचा अळ्यांचा थर
आणि मनातली जलपर्णी यांची
पण प्रत्येक गोष्ट कलाकृती म्हणून समोर येऊ लागली
मोठमोठे कल्चर्ड आणि डिग्निफाईड लोक म्हणू लागले
वा वा किती ग्रेट

कोणतीच प्रक्रिया न होता माझे अवयव
विक्रीयोग्य होऊ लागले
मग लक्षात आले की खास कलात्मक
टचेस दिल्यावर तर माझ्या संवेदनशीलतेने
विक्रियोग्यता आणि माझा विषारीपणा
यांत अधिकच वाढ होते मला आदरणीय करत

मग एक भयानक प्रश्न समोर आला
कलावंत म्हणून गाजायचे
की अनाम होण्याचा मार्ग शोधायचा

या प्रश्नाच्या कलेलाही ग्रेट म्हणत मोठे ग्राहक आले
--- ००० ---

## प्रसंग

प्रसंग म्हणजे दगडच
सोलताही येणारा
आणि थर चढवले तरी
घेत राहणारा

त्याच्या आत असू शकतात चंद्र
किंवा साधीशी
मारलेल्या कोंबड्यांची पिसे

एकच हा महात्मा असल्याप्रमाणे
गुंतवून ठेवतो अनेकांना
आणि विभक्त करत राहतो
सर्वांची जगे

मुख्य म्हणजे तो
निष्कर्ष निर्माण करतो
बाहेरचे जग
हे त्याचा भागच असल्याप्रमाणे

तो स्मृतीत जाऊन बसला
तरी मरत नाही
--- ००० ---

## ग्लॅमर

झाडांमध्ये वा फुलपाखरांमध्ये
फेमस होऊन उपयोग काय

त्यांना माझ्याबद्दल ना आदर वाटणार
ना ईर्षा ना हेवा वा ना प्रेम

त्यापेक्षा मस्त हिरवीगार तरणी
उडती माणसेच बरी रंगीबेरंगी मने असलेली

माझ्या ग्लॅमरमुळे ती मने थोडा वेळ तरी
सुखा ऐवजी न्यूनगंडात मग्न व्हावीत

--- ००० ---

पडदा

तशी तर कुणाला कल्पनाही नसते
की बाबा सिग्नलच्या प्रकाशात
भूतकाळ मिसळला जाईल
पण हे घडते
आणि जोराचा पाऊस पडल्याप्रमाणे
डोंगर धसतो
घट्ट मतांच्या धोंड्यांसह
आतून फुटणाऱ्या

तेव्हा येते लक्षात
ना आपले धोंडे वास्तवाशी सुसंगत होते
ना काळात अबाधित राहणारे

आपण प्रवाही न राहिल्याने
आजारी होत गेलो
आणि फुटला आपला मेंदू
आपल्याच मतांच्या निष्ठुरतेने

पण राजकीय घटना आणि विविध माणसे
यांची भलावण वा तिरस्कार
न करता जगताच नाही येणार
हा निष्कर्ष यावर पडदा टाकतो
--- ००० ---

वंदन

स्वतःचे हात पाय डोळे
यांनाही तो वंदन करे
मी जे काय यश मिळवतोय
ते यांच्याच आशीर्वादाने
असे म्हणे

ऑफीसच्या पहिल्या पायरीला
आणि केबिनच्या दारालाही
तो वंदन करून नम्र होई

महाभारतात कर्ण चुकला
पण अर्जुनाने धनुष्यबाणाला वंदन केले
म्हणूनच ते शस्त्र त्याला वश झाले
हे तो जाणून असे

चांगले जगणे म्हणजे यशस्वी होणे
हे त्याचे पक्के होते
रस्त्यात लागणाऱ्या प्रत्येक देवळाला
वंदन करणे ही त्याची अविभाज्य सवय होती

एखादे राहिले तर त्याला प्रचंड रुखरुख वाटे
इतकी की यशालाच धोका यावा

यावर उपाय म्हणून त्याने वंदन बंदच केले
तेव्हा कुठे मनाला शांतता आली आणि
आता काम जरा अधिक जमेल असे वाटू लागले

--- ००० ---

## मीच

मी म्हणालो
मी लिहीन तुझी कविता
तुझ्या मनातून
ती म्हणाली
चालेल
मग मी लिहिली तिची कविता
माझ्या मनातून
तर ती म्हणाली
मीच

--- ००० ---

जेके

ते तेच कावळे होते
जे जेजेमध्ये जे
कृष्णमूर्तींच्या व्याखानाच्या वेळी
संध्याकाळची कावकाव करत असत

पत्रकार परिषदेत तुमचे काय काम
असे विचारता ते म्हणाले की
तिकडे सरकार उलथून पडतेय
आणि ते या उत्तरे देणाऱ्याला माहीतच नाहीय

पण मग दुसरे कुठलेही कावळे का नाही आले
तुम्ही जेजेवालेच का आलात
असे विचारता ते म्हणाले की खरे तर
आता आम्ही जेजेवाले नाही

जेकेंचे आपल्याला काहीच कळत नाही
हे कळल्यापासून आम्ही
शक्य तिथे तिथे
पत्रकार परिषदांत गोंधळ माजवत फिरतो

चाललेले सगळे विस्कटत राहिले पाहिजे
अशा सूडभावनेने आम्ही हे करतो

याला जेकेच जबाबदार आहेत
--- ००० ---

आपण

आपण सहज म्हणून
वेटिंग रूमच्या बाहेर येतो
तर समोरच मध्यरात्री येणारी
एक्स्प्रेस येतेय आणि आपली धावपळ

ही इतक्या लौकर कशी काय आली
की आपण हॉटेलमधेच आहोत अजून

आपल्याला खरे तर
काहीच बोलायचे नसते
पण निव्वळ दर्शनाने आपण उत्तेजित होतो
आपले विस्कळित मन
एककेंद्री करत प्लॅटफॉर्मवरच्या कँटीनवर

तिथे काय करतेय ही आपली हिरॉईन
मंदस्मित करत
जरी इथे थांबावे तर गाडी चुकेल
आणि बेजबाबदार म्हणून
आपली बदनामी होईल
हे माहीत असून

आपण बोलुन जातो खूप वेळ ताटकळलेले शब्द
आणि एकदम दृश्यच बंद होते

त्यापेक्षा सरळ ती गाडी पकडून
दिल्लीला जायला हवे होते आपण
--- ००० ---

चांगले वाचन

हमखास काही चांगले वाचावे
असे वाटले की मी कविता लिहितो
आणि तीच वाचतो दहा वेळा

मला आश्चर्यही वाटते --
आपले मन इतके छोटे
इतके वखवखलेले
इतके अपराधगंडाने विच्छिन्न
असूनही हे कुठून आले सगळे

निरर्थकतेचा सागर खुला करून
आपल्या मनाबाहेरचा
विसावा दाखवणारे

माझ्या भुक्कड मनाने
हे समजून घ्यायचा प्रयत्न
मी सोडून देतो

असेच हमखास चांगले वाचले जाते

--- ००० ---

## क्षण

धर्मांचे जातींचे राजकीय पक्षांचे
नेत्यांचे त्यांच्या कृतींचे
असलेले नसलेले खरे खोटे
आरोप ठेवून एकूणच क्रोधाने
जिकडे तिकडे मॉब लिंचिंग

स्त्रिया पुरुष बरोबर वा वाईट
अटी व शर्तींसह
सहभागी असणारे वा बघे
अटी व शर्तींसह
मैत्री वा दुष्मनी
अटी व शर्तींसह
सखोल आसक्तीही
अटी व शर्तींसह
प्रेमाची स्वप्नेही
अटी व शर्तींसह

शंभर टक्के विश्वासही अटी व शर्तींसह

सगळेच सहानुभूतियोग्य मॉब लिंचिंग

यही तो है जिंदगी
असा आसूहसूयुक्त या सगळ्याचा गौरव

यातच मधेच लाभो तुझ्या सहवासाचा एखादा क्षण
क्षणभंगूर का असे ना पण विसरभोळा

--- ००० ---

## किंचित स्मित

तुम्ही उभे आहात
वा बसलेले वा कामात आहात
झोपलेले वा प्रवासात आहात
अंघोळीत वा प्रार्थनेत आहात
कशाला
नुसते आहात तुम्ही याचा अर्थच
तुम्ही याच्या बाजूचे आणि त्याच्या विरोधात आहात
मग तुम्ही मेंगळट असा की लढवय्ये

माणुसकी प्रेम शांतता सहकार्य सहजीवन
हे जितके तुम्हाला आवडते तितकेच इतरांनाही

मानवी समस्यांच्या सेमिनारमध्ये
तुम्ही एकत्र येता
अत्यंत धूर्तपणे आपापल्या बाजू मांडता
तुमचेच भाषण प्रभावी व्हायला हवे असते

परतीच्या प्रवसात तुम्ही
डावपेच आखत आखत झोपी जाता

बरोब्बर पहाटे तुम्हाला जाग येते
काही प्रॉब्लेमच नाहीय जगात
असे वाटते तुम्हाला क्षणभर

तुम्ही किंचित स्मित करून
दात घासायला जाता
--- ००० ---

पुन्हा शब्द

शब्द नसले तरी दिसणे असते
दिसणे नसले तरी गंध असतो
गंध नसला तरी
सहवासाचा फील असतो

हे सगळे थांबवणारी भिंत
बांधताच नाही येणार

हे समजतच असते मनोमन
आणि निश्चिंत असतो निसर्ग

यातूनच शरणार्थी विचारतो
चालतील का आता पुन्हा शब्द
--- ००० ---

## बागेचा विरह

राणीची बाग तशी आमच्या वस्तीजवळच होती
म्हणून जाणे व्हायचे – मग तेच
अधिकाधिक आवडीने होऊ लागले
पण आमच्या इकडची जमीन
विमानतळासाठी अधिगृहीत झाल्याने
आमच्या पाण्याच्या पाईपलाईन्स काढल्या गेल्या
त्यामुळे आमची वस्तीच लांब गेली
आणि मग त्या विमानतळाला
संत तुकाराम महाराजांचे नाव द्यावे
याच्या आंदोलनात आम्ही गुंतून गेलो

कपडे वा खाद्यपदार्थ
यांबाबत मी फारसा चोखंदळ नाही
नुसती खानावळ बदलली
आणि विसरूनच गेलो मी ती राणीची बाग
पण पुन्हा तिकडे जाणे झाले कोणत्याही कपड्यांत
तर त्याच तेव्हाच्याच पॅशनने आवडेल ती मला
जरी मनात त्या नामांदोलनाचे विचार असले तरी

एकदा आता मी राणीच्या बागेचे चिंतन करत
संत तुकाराम महाराजांचे अभंग वाचणार आहे

मी माझे मन काय म्हणतेय ते तसे त्याला करू देतो
पण त्याचे लाड असे नाही करत – म्हणजे असे की
त्या बागेचा विरह मी साजरा नाही करत बसत
दुःखमयतेने

--- ००० ---

## मध्यमवर्गीय

सनसनाटीपणाची आवड असूनही
मी पस्तीस वर्षे रटाळ नोकरी केली
मुले संसार आणि मधेच सहली केल्या

कुणी कुणाला डिस्टर्ब करू नये
अशीच एक मध्यमवर्गीय भूमिका
घेत जगत आलो पण हिंसेच्या बातम्या
आणि रक्तबंबाळ सिनेमे
आणि व्हिलन्सचा नायनाट हे जोपासले
पण एकत्र जमल्यावर आम्ही स्वतःला निर्जीव समजलो
आणि पराभव मान्य करत
अहिंसेच्या मूल्याचा उद्घोष करत राहिलो

कर्तृत्ववान लोक म्हणत असलेले ऐकले
की जोष हवा आणि मरो या मारो ही प्रेरणा हवी
नाही तर मेंगळट रटाळ कंटाळवाणे होईल सगळे
आपला इतिहास आपली संस्कृती आणि आपली माती
यांबरोबरच घराणे जात धर्म हे हवेच म्हणाले सगळे
लाईफ इंटरेस्टींग व्हायला हवे असेल तर

मूल्यांची भक्ती आणि हिंसेसाठी शौर्य
हे एकत्र असलेलेच जगतात
बाकीचे नुसते प्रेतरूप भारवाही असे ते म्हणत

आम्ही मध्यमवर्गीय होय होय म्हणत घरी जात आलो

--- ००० ---

दिलासादायक

समुद्रावर येण्यापूर्वी
नुक्तीच पाहिली होती फुलपाखरे
पण त्यांचे रंग त्याला सांगण्यात
काही औचित्यच नाही वाटले
कारण आपापली ओळख
संभाळणाऱ्या जगात
एकमेकांचा संबंधच काय

बलात्कार करून हत्या केल्या गेलेल्या
त्या स्त्रीला तिचे गुन्हेगार फाशी दिले गेले
हे कळणार नाही
आणि ना शिक्षा म्हणून आपले जगणे
संपवण्यात आल्याचे त्या गुन्हेगारांना
जिवंत लोक मात्र बोलत राहतील
न्यायाबद्दल

हे तर
भूतकाळाची फुलपाखरे समुद्रावर सोडणे नुसते
जिवंत लोकांचे आपापल्या ओळखींतून
असंबद्ध

समस्येचे निराकारण झाल्यासारखी ओळख
दिलासादायक मनांसाठी
--- ००० ---

रोजचे जगणे

ताट नैवेद्याचे आहे म्हणून
भर दुपारी तापल्या उन्हात
अनवाणी चालत पाय भाजत
देवळापर्यंत जाऊन
निर्दयपणे तापलेल्या
दगडी पायऱ्या चढून
देवळात पोचून देवासाठी
असे दिव्य पार पाडणे
हे अघोरी आहे

आणि मग तो तापलेला रस्ताच
कशाला हवाय रोजचे जगणे असताना
आपल्या आवडीचे
--- ००० ---

अवकाश

तिच्या केसांतून निघालेल्या
ताकदवर सळ्या
उड्डाणपुलाच्या कामी आल्या
पण माझा स्वभाव म्हणू की
समजा तटस्थता किंवा
पटण्यासाठी म्हणू सहनशीलता
मी म्हटल्याप्रमाणे
तो पूल वापरतो
पण तिची आठवण नाही काढत

एखादा दुरावा म्हणून
नाही सोडत मी साबणाचे फुगे
उलट ते असतात
जणू माझ्या संगीतरचना
मला माझ्या आयुष्यात बुडवणाऱ्या

माझ्या गाण्यांत स्त्रियाही असतात
ज्या ऑफिसांतून आल्यावर
फक्त ताजमहालाचे चित्र पाहात
झोपी जातात जणू त्यांनाही
फक्त रूटीन पुरेसे असते

हा स्वाभिमानही नसतो
घडले ते जाऊ दे
इतकेच म्हणणारा
हा एक अवकाश असतो

--- ००० ---

पारा

घरासमोर असावी एक निळी इमारत रोज दिसणारी
जणू अंघोळ झाल्यावर मी दिसावे हास्यवदन आणि रात्री उदासीन

काय हे महत्त्वाचे नसून क्रोध असणे प्रेमाने हळुवार
नावेसारखे नाजुक होणे अय्या कित्ती छान किंवा वॉव होणे
अजगराच्या पोटातून भविष्य पाहणे
आपल्यासारख्याच मर्त्य मित्राचे पोस्ट मॉर्टेम झाल्यावर
त्याच्या अदृश्य नातेवाईकांना दगड मारणे
आणि ऐंशी फुटी विहिरीत दिसणारे
तळव्या एवढे पाणी आपल्याच फेट्यावर
ओढून घेणे आणि परंपरागत
भरीतभाकरीचे गुणगान गात
जातिद्वेषात आत्मसंतुष्ट राहणे

हे सगळे हवेय कवितेत तुम्हाला याचा अर्थ
तुम्ही घाबरलेले आहात
तुम्हाला अमर व्हायचेय
तुमच्या मनाला नकळत हवाय
गोष्ट पूर्ण करणारा रहस्यभेद

ही कविता तुमचा पारा उतरवत आणेल
क्षोभ नको म्हणत म्हणत राहील
आहे ते बघू या बाहेर येत

आणि मग शेवटी विचारेल
काय उरतेय आता

--- ००० ---

मूलाधार

पचनसंस्था नीट चालेल ना श्वासोच्छवासात
अडचण नाही ना येणार जवळचे नातेवाईक मित्र
ठीक राहतील ना आणि मुख्य म्हणजे
माझे उत्पन्नसाधन गोता नाही ना खाणार
आणि त्याहून मुख्य म्हणजे
माझी प्रतिमा राहील ना अबाधित
( प्रतिमाभंग करणारे माझ्यात बरेच असून )

असे विचार समजा नको आहेत डोक्यात
किंवा हे डोक्यात आल्यामुळेच
कदाचित तसेच घडण्याची भीती आहे
तर जमेल का हे विचार वा यांतला एकही विचार
टाळता येणे वा नष्ट करता येणे

या प्रश्नाच्या नकारार्थी उत्तराने
दरदरून घाम फुटतो
माझेच मन का म्हणून सक्ती करतेय
मलाच सतत धोक्यात राहण्याची

आणि मग मनच सांगते की बाळा
मी असेन तोवर असणारच हे सगळे
माझ्यातले अमुकच एवढेच
टाळायचे ऑपरेशन शक्य नाही होणार

आणि मलाच तू मान्य केलेयस
जगण्याचा अटळ मूलाधार म्हणून
--- ००० ---

मराठी साहित्यात

पराभव होऊनही
स्वतःच्या मतांबद्दल फारच टची राहात
जराही वेगळे काही सहन न होणारे
लोकशाहीवादी आक्रमक होत
आणि टोले-प्रतिटोले करत
सहिष्णुतावादी विद्रोही झाले

पण एका वेगळ्या परिस्थितीत
हिंदुत्ववादी कम्युनिस्ट होत
त्यांनी सभात्याग केला आणि तरीही
आधीचे प्रादेशिक हित लक्षात घेत
जागतिक मानवी हक्क संघटनेला
त्यांनी सडेतोड उत्तर दिले

लोकशाहीत विचारसरणीपेक्षा
जनतेचे हितच महत्त्वाचे असते
हे जनता समजून होती
पण काही किरकोळ विचारवंत
बोलत राहिले चेवाचेवाने
सर्वांच्याच भूमिकांतील आंतरविरोधांबद्दल

एवढे होऊनही शुद्ध साजुक
सचोटीच्या भूमिका असणारे
जनतेपासून तुटून सेफ राहिले
मराठी साहित्यात

--- ००० ---

पोळे

रस्त्यावरच्या दिव्याभोवतीचे किडे
आहे तेवढे जगत असणार नीट
आपण कुणाला नको आहोत या भावनेशिवाय

अचानक अनेक काचेच्या डिशेस
पडून फुटल्या तेव्हा या घराबद्दल
काय आले असेल त्यांच्या मनांत कोण जाणे

घर वा ऑफीस वा संस्था
वा एखाद्या नात्यातच नकोसे होणे
हे उतू गेलेल्या दुधासारखे ताबाहीनच

आपण पाळलेल्या कुत्र्याला खूप लांब
सोडून आलो होतो आपण तरी ते आलेच परत
प्रेमाने की आपण हवे आहोत इथे असे वाटून

सर्वत्र सुसंधी मान आणि आपलीच पृथ्वी
असे जगता येणे म्हणजे अमर्याद पाणीपुरीच
आपल्या नखांचे वर्चस्व मान्य असलेली

कुठेही जाण्यायेण्यापेक्षा प्रेमाच्या शोधात
आहे इथेच नगण्य होत जावे किड्यांना
दिव्याभोवतीच्या मधाचे पोळे कोण घडवू देईल
--- ००० ---

मुकाबला

कवितेतल्या वस्तू
यायला हव्यात निरर्थातून
अन्यथा त्यांचा आधीच झालेला असतो
सकाळच्या चेतक चहाचा सवयीचा चोथा

जगत जाण्याचा हाच असतो मुख्य प्रश्न
सुंदर सूर्यास्त दिसण्याआधीच
दिसतो त्याचा आठवणीतला सारांश

याचा मुकाबला ठरवून कसा करणार
त्याला कवितेचेच असणे
असायला हवे
मुकाबला नसलेले
--- ००० ---

हा समाज

दुःखमुक्ती म्हणजेच धर्म
पण धर्मांची लेबले धारण करून
स्वतःसह सर्वांनाच दुःखी करणे
हेच आता धर्मांचे मुख्य काम

कुणी फुले शाहू आंबेडकर म्हणा
कुणी टिळक साठे ठाकरे म्हणा
कुणी ज्ञानेश्वर तुकाराम पुल म्हणा
सर्वच लेबलांची आभूषणे विपरीत
टिळे लावणारेही सगळे धर्मनिरपेक्ष
आणि जातींच्या ओळखींत लडबडलेलेही
जाति-अंतवादी
असे सगळेच पुरोगामी

आत्मवंचक ढोंगी आणि हिंसक
हे शब्द अलंकार नाहीत
पण अचूक वर्णने म्हणून शोभतील असे

समस्या सगळ्या इतरांमुळे आहेत
माझ्यामुळे नाहीत
अशी कट्टर खात्री असलेले
सतत एकमेकांवर हल्ले करू इच्छिणारे
पण संख्याबळावर आधारित
धूर्तपणा आणि मुत्सद्दीपणा करणारे
अशा लाडक्या नेत्यांचे
स्वाभिमानी लाडके एकनिष्ठ कार्यकर्ते
असलेला विशाल जनसागर म्हणजेच

गर्वाने आणि ऐतिहासिक लढाऊ बाण्याने
फुललेला हा खुजा टाईमपास समाज

सतत उपरोधिक कुत्सित बोलणारा
टोमणे मारणारा खवचटपणात रमणारा
टोले-प्रतिटोले लगावणारा
चेष्टा टवाळी करणारा
खिल्ली उडवणारा
हा ट्रोली आणि टोळी समाज

सगळेच असे वागतात तर मीच एकटा
चांगला कसा वागू
मराठी माणसाला नकोत का त्याचे हक्क
सर्व धर्मांना त्यांची त्यांची भूमी आहे
तर आम्हाला नको का आमची हक्काची भूमी
असे बिनतोड आणि मूलभूत प्रश्न
प्रामाणिकपणे विचारणारा

हा नाजुक भावनांचा
अभिव्यक्तिस्वातंत्र्यवादी समाज
राम आंबेडकर शिवाजी महंमद
यांचे विडंबन न चालणारा
शोषितांच्या न्यायाची
तातडी वाटणारा उदात्त माणुसकीचा समाज

प्रत्येक माणूस सात्त्विक संतापाने
युक्त असलेला आणि एकमेकांना घाबरून असलेला
शांततावादी साळसूद मूल्यभक्त आणि संविधानभक्त समाज

हा बेरोजगारी गरिबी शोषण

आणि अस्मिता आणि द्वेष या रोगांनी ग्रस्त समाज

आत्ममग्न आणि आत्मगौरवी

--- ००० ---

आसक्ती

आसक्तीच्या बोलण्याने मन बिथरते
म्हणून पूर्ण अबोला चालु होता
म्हटले बोलणे जाऊ दे
नुसती कविताच लिहितो सर्वांसाठी
चालेल का

आणि ही काही आसक्तीची वा प्रेमाची
नाहीय कविता वा मनधरणीचीही नाहीय
कोरडी ठणठणीत भावनाहीन
आणि अर्थहीन आणि मुख्य म्हणजे
मन नष्टच करून लिहिलीय ही कविता

आता काय आहे या कवितेत
करावे तरी काय
नाही म्हणजे नाहीच पटत
अजून --
--- ००० ---

## दुतर्फी

खरे तर बोलायचे काहीच नव्हते
उगीचच संपर्क नुसता
संध्याकाळचे छाया-प्रकाश खेळ
तसे तर माझेच नुसते
नुसते मनाचेच तर काय
तुझ्या व्यापात तुला न पोचणारे
किंवा जणू न पोचणारे
किंवा जणू पोचलेच नाहीत
असे मुद्दाम दाखवले गेलेले

चहाप्रिय वेळ
साधलेली जणू निर्हेतुक
जणू जाता जाता
सहजसे एक स्मित
मानसिकच तर काय

एखाद्या अक्षरात
जणू असावी एक पूर्ण कविता
क्षणिक पण अमर्याद
हव्या त्याच अगाध
परिपूर्ण आशयाची

ना देण्याचा त्रास
ना घेण्याचे सत्य
अशी पण दुतर्फी
--- ००० ---

शिल्पकार

मी तुला शब्दांनी घेरू शकतो
असंख्य प्रतिमांनी भ्रमित करू शकतो
तुझे लक्ष विचलित होऊच नाही शकणार
अशा जादुई संपर्कांची रास रचू शकतो
तुला नकळत लुटू शकतो तुझा काळ
तुझ्या आक्षेपाला वावच न मिळता
तुझी प्रावरणे विसरून
व्हावे तुझे मन पूर्ण खुले
असे काल्पनिक स्पर्श
भरू शकतो मी तुझ्या जगात
नासधूस करू शकतो
तू निगराणी केलेल्या तुझ्या बागेची
आणि तुझे पाळीव पशुपक्षी
घेऊ शकतो मी माझ्या कह्यात

याबाबत तुला काहीही शंका नाही
हे मला माहीत आहे

तूच तर आहेस माझ्या
आत्मविश्वासाची शिल्पकार
--- ००० ---

बंधन नाहीय

बंधन नाहीय माझ्या कवितेला
असे समजा की ती भोसकूनही टाकू शकते
रस्त्यावरून चाललेल्या एखाद्या माणसाला
वाचकांना कारणे न पटवता
ती शोकगीत गाऊ शकते वा होऊ शकते
रोमांचित आणि रोमँटिक
ती पूर्ण विश्व भरून टाकू शकते
तीव्र आसक्तीच्या दगडी पदार्थाने
आणि खुलीही असू शकते
पूर्ण नसण्यात

ती कोणत्या जगात आहे
हे ती ओळखत वा सांगत बसणार नाही
ती कोणत्याही माणसाचे चरित्र
असू शकते वा माझे आत्मचरित्र
ती गुंतलेली असू शकते
कोणत्याही रामरगाड्यात
वा तटस्थही असू शकते
सुखाचे अत्युच्च शिखर समोर
हात जोडून उभे असताना

कधी ती मला संतही करू शकते
कधी लटकवून टाकावे असा गुन्हेगार

ती बांधील नाही आशयाच्या अलिकडे
असायला वा आशयच असायला
--- ००० ---

प्रेयसी ( अनुवाद )

-- पॉल एल्युआर्ड.

ती उभी आहे माझ्या पापण्यांवर
आणि तिचे केस गुरफटलेयत माझ्या केसांत

तिला माझ्या हातांचा आकार आहे
ती माझ्या डोळ्यांच्याच रंगाची आहे
माझ्या सावलीने तिला गट्टम केलेय
जणू आकाशाला भिडलेला दगडच

तिचे डोळे सतत उघडेच असतात
आणि मला ती झोपू नाही देत
दिवसाच्या लख्ख उजेडात तिची स्वप्ने
सूर्यांची करतात वाफ
मला हसवतात, हसायला आणि रडायला लावतात
आणि बोलायला लावतात बोलण्याचे काहीच नसताना

--- ००० ---

## नॉर्मल प्रकाश

अहो हे संपूर्ण नाटकच स्वप्नदृश्यांचे आहे
आता तुम्हीच सांगा
हे अंधारात करू की रंगीबेरंगी प्रकाशात
तुम्हाला कंटाळा नाही येणार का
अशा सततच्या ऍब्नॉर्मल प्रकाशामुळे
म्हणून ठरवलेय
की सरळ हे नॉर्मल प्रकाशातच
करायचे सादर तुमच्या कल्पनेवर सोपवून

खूप विचार केला आम्ही
की बाबा आहे कंटाळवाणेच
पण ट्रिका अशा करू की
तुम्हाला वाटावे की इंटरेस्टिंग आहे
स्वप्ने बोगस वाटत गेली तरी

नटनट्या चांगल्या आहेत आमच्या
अभिनयाबरोबरच तत्त्वचिंतकही आहेत
पुराव्याशिवाय स्वप्न खरे न मानणाऱ्या
स्वप्नातही बुद्धिवाद जपणाऱ्या

कधी कधी मात्र त्यांच्यांत चर्चा होते
की बाबा प्रत्येकाचे जर वेगळेच असेल जगणे
तर सत्य कसले शोधणार आणि मग सर्वांचीच
स्वप्नावस्थाच चालु असते असे का म्हणू नये

असल्या चर्चेने शेवटी कंटाळतात त्या नटनट्या

--- ००० ---

## पांढरी कबुतरे

माणसे असतात.

मग त्यांच्या टोळ्या होतात.

मग आपली सुरक्षितता, आपले सुख आणि आपले वर्चस्व या प्रेरणा फुलतात.

मग त्या टोळ्या एकमेकांवर अन्याय करतात.

मग ते ते अन्याय निवारण करण्यासाठी शूर, कर्तबगार विभूती जन्मतात.

मग त्या विभूतींच्या त्यांच्या अनुयायांत अस्मिता बनतात.

मग टोप्या, पगड्या, फेटे येतात.

मग एकेका रंगावर एकेका टोळीचा हक्क ठरतो.

मग पांढरा रंग हा शांततेचा, असे ठरते.

मग शांततेसाठीच अस्मितांचे टकराव चालु राहतात.

मग स्वातंत्र्य, सहिष्णुता आणि सहजीवन यांवर भाषणे होत राहतात.

मग ज्यांची शक्ती जास्त ते न्याय करत राहतात.

मग मधेच कुणी, " माणसा माणसा माणूस हो " असे सुभाषित बोलुन झोपी जातो.

चांगले म्हणजे काय हे सर्वांना माहीत असते पण ते वेगवेगळे असते.

असे तर असणारच, त्यासाठीच तर लोकशाही हवी, असे सर्वच म्हणतात.

आपणच न्यायी, बंधुप्रेमी, स्वातंत्र्यभोक्ते असे सर्वांनाच वाटत राहते.

विचारांचा मुकाबला विचारांनीच केला पाहिजे, हे सगळ्यांनाच पटते.

शेवटी वैतागून पण सस्मितपणे शांततेचे प्रतीक म्हणून सर्वजण पांढरी कबुतरे हवेत सोडतात.

यातूनच मानवी जगणे आनंदाचे आणि समृद्धीचे होईल याची सर्वांनाच खात्री असते.

काहीजणांची आणखीही काही वेगळीच मते असतात.

--- 000 ---

## वीज

याच थियेटरमध्ये साठले होते
पावसाचे पाणी मनाचे नाले बुजवून
स्वप्ने बांधल्याने एका डिशमध्ये
दहा पाणीपुऱ्या जणू

उडाणटप्पू म्हणून शब्द
मनात आले तसे वापरले
आणि कुठेच काहीच नाश पावता कामा नये
म्हणून पायऱ्या उतरताना
आवाज न होण्याची काळजी घेतली

काहीच पटवून देणे शक्य नसल्याने
अपघातानंतरही तक्रार केली नाही
हसून निरोप घेत उलट अमुक हॉटेलात
डोसे चांगले मिळतात हे सांगितले

सर्वांनी सर्वच वस्तू मान्य केलेल्या होत्या
त्यामुळे सवयीचे होऊन बसले होते जारणमारण
कशाचेच आश्चर्य नव्हते वाटत

रोज पानांचा प्रचंड पाचोळा
साठणारे रस्ते पर्यावरणाचा अभिमान बाळगत
सत्याची बाजू घेणारे म्हणून गर्वाने वागत

हा भूतकाळ पाहून एकच गिल्ला होतो अचानक की
ताबडतोब याच क्षणी चमकू दे वीज

--- ००० ---

ध्यान

आधी होती आत्मकीव
मग धीर धरायचे ठरवले
मग मात करून
धाडसाने आक्रमणच
करायचे ठरवून
आकांक्षेसाठी
थकवा दुर्लक्षिला
मिळवत यशाचे इमले
भुलवत आणि चकित करत
इतरांना सुखावत स्वतःला

विश्वासाने गंभीर होत
शांत नम्र पक्व होत
धीर देत इतरांना
आयुष्य हळूहळू
संपवत आणले

तेव्हा पडला प्रश्न
की काय राहिले काय बदलले
आणि आता सध्या
जो कोणी आहे मी
त्याचे शेवटी काय होईल

सुखात गोंधळत शेवटी
सरळ ध्यानच करावे की काय
असे वाटले
--- ००० ---

## गिचमीड

रंगांची गिचमीड म्हणजे चित्र नव्हे
आणि शब्दांची गिचमीड म्हणजे कविता नव्हे
मनच गिचमीड असेल तर कसले संगीत

मृत्यूचा बडेजाव माजवणारे जगणे
हक्काची चैनच
आणि सुखे तरी असंख्य कशी असणार
जी आली निवडक मोजकी
तीच पाताळात मुळे घट्ट रोवणारी

मर्यादांची तक्रार करणार तरी कुठे
म्हणून विनातक्रार निर्जळी यात्रा

आलो कुठून जायचेय कुठे
मरू दे ते फुकटचे ओझे
जगत जाता येतेय ना गुंतत गिचमिडीत
मग बास ते कॅलरी मोजत बसणे

--- ००० ---

भ्रम

अप्रूप असे काही नसतेच मला
नष्ट होतात माझी स्वप्ने
पाहून होताक्षणी
आणि लोक ज्याला म्हणतात वास्तव
ते तर मी जागा असतानाच खोटे पडते
कारण खूप मने दिसतात मला
आपापल्या प्रेयसींसाठी अनेक दिशांनी
जिवाचे रान करणारी

एका चाळीतल्या अंधाऱ्या जिन्याची
एक पायरी तुटलेल्या आठवण
आजही आहे माझ्या संग्रही
पण तो संग्रह आणि मी
राहतो घराबाहेर

मी सिगरेट ओढतच नाही
असे खूप आहे
जे अस्तित्वातच नाही आले

माझा आग्रह नसतो
कुणी खूप हट्टाने सूडाचे बोलतो
तेव्हा मी नसतोच तिथे
तर काय बदल घडवणार

घटना नाहीच घडत कधी
हा भ्रम मला सत्य वाटतो
--- ००० ---

## खुर्चीवर

तसा तो सतत बसून असे
खिडकीशेजारच्या खुर्चीवर
आणि वाचत राही
खूप जगत राहण्याबरोबरच
एकामागोमाग एक पुस्तके

महायुद्धे कुणाकुणात का झाली
इथपासून ते रशियातले आणि फ्रान्समधले
आजचे कवी आणि जगातली
बेस्ट सेलर पुस्तके तो वाचे
आणि तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र
आणि दहशतवादी कारवायांचा इतिहास

घरचे लोक अभिमानाने त्याला सर्व सेवा देत
चार लोक कधी भोवती जमले तर
तो समृद्ध ज्ञानपूर्ण बोले
कशालाही जोडून काहीही आठवत

आणि मग शेवटी सांगे
हे सगळे माझे बोलणे म्हणजे
समजा एक आजची
अतिवास्तववादी कविताच

आणि रूटीन वापरायच्या भाषेतले
अर्थ नका लावत बसू

--- ००० ---

## अस्पष्ट

धुक्यामुळे डोंगर
दिसायचा थांबतो
तसेच माझे अबोध मन
आणि थोडेफार सबोध मनही

कोणतेही विचार म्हणजे
मला अस्पष्ट फडतूस मतेच वाटतात
व्यक्त होताच कुणी
विरोधकाने अंगावर यावे अशी

शक्ती एकवटायची जिद्द
असलेलेच मिळवतात
जग सुधारायची संधी
आमच्या सर्वांच्या एकत्रित मनाचा
एक भाग असलेले

धोका एकच असतो
त्या एकत्रित मनाचे ऑपरेशन करून
माझे मन म्हणावे असा
हा अनावश्यक भाग
ते कापून फेकणार तर नाहीत

समाधानासाठी मी निरीक्षण करतो
मी तरी माझ्या मनाचा कोणताही भाग
असा फेकलेला नसावा बहुतेक
--- ००० ---

समाजात

एका कवितेने
उघडला रस्ता
थांबवत बंदपणा

मी एका बंदिस्त खोलीत
बाहेर न जाण्याच्या बोलीवर
एकटा पण खूप
आठवणींसह

कोणताही समूह सोबत नसताना
जयंती पुण्यतिथी नसताना
त्या कवितेला
ती व्हायला हवीय माझी प्रेरणा

जिच्या सन्मानासाठी मी दंगल करेन
मनातल्या मनात कृतज्ञता म्हणून
माझ्या मनाला
नेमका धक्का दिल्याबद्दल

माझे एकट्याचेच दैवत होईल
ती एकच कविता कुठूनही आलेली
जरी ती ठार केली जात राहिली
अनुल्लेखाने इतरत्र

माझ्या मनाच्या समाजात मात्र
सळसळती नेमकी आणि बिनचूक
--- ००० ---

थंड वारे

नाही तरी हवा दूर दूरच
ढकलत चाललीय
हळूहळू वाढवत थंड वारे
स्मृती अंधुक करत जाणारे

उत्तेजक आठवणी
तासंतास प्रवासाच्या
काव्यशास्त्रविनोद होत
लुप्त होताहेत

संपर्क नकोसेच होताहेत की काय
प्रेरक झाडांचे शेडिंग
फक्त ठसे म्हणून
विहरावे पक्ष्यांऐवजी तसे

उद्यावर गेलेल्या पापण्या
आणि न सोलण्याची संत्री
अशी वस्त्रे
जणू हुतात्मा स्मारकाशी फेडलेली

आता कारणेही नकोत
हजार मैलांवर आपापली कॉफी
पिऊन कामाला लागता येईल
आठवणी विसरत

एकत्रितपणे

--- ००० ---

निर्बुद्धता ( Absurdity )

निर्बुद्धता आहेच ना
जगण्याच्या मुळाशी
चिडून उपयोग काय
किंवा ती नाहीच आहे
असे म्हणून तरी

माहीत नसलेले माहीत
होत जाईल हो खूप खूप
पण बुद्धीची ही सवय
संपणारच नाही

आणि माझीच बाग
नेणार मी विस्तारत
या बुद्धीला तीव्र
कसे नाकारणार

माहिती जमवत
चला बोंबलत
आणि डोकी फोडत
समता आणण्यासाठी

माहिती जमवण्याच्या मार्गात
बसवता यायला हवे वैज्ञानिक
संशयाने पत्नीचा छळ करणे

आज ना उद्या होईल बाबा सगळे प्रेममय

--- ००० ---

## एडिपस

आपल्या खिशात काही
समुद्राचा आवाज नाही असू शकत
तरीही आपण फुशारक्या मारतो
हजारो आरसे फोडून
तितक्याच सौंदर्यवतींना वश केल्याच्या

आपल्या दुचाक्या पाण्यात
वा वाळूवरून घसरतात
त्याचा दोष आपण
आकाशातल्या शेवाळ्याला देतो

आणि आपण म्हणतो की हळूहळू
पूर्ण कंट्रोलच स्थापित होतोय आपला
दंगली आंदोलने जाळपोळ दगडफेक
यांच्या मानवी प्रक्रियांवर

तसे अवघड काहीच नसते
कारण आपल्याच मनांच्या
जाळ्यांत सापडणाऱ्या
सर्व पक्ष्यांवर विश्वास ठेवला
की झाले

इतरांचे आणि सर्वांचेच तेच चालु असते
कर्मकांड यज्ञयाग
यांकडे पाहताना मात्र मात्रागमन झालेल्या
एडिपससारखे डोळे फोडून घ्यायचे की झाले
--- ००० ---

शेकोटी

नुसती इच्छा होण्याचा अवकाश
इच्छित मन सर्वस्वाने हजर
ना शब्दांची गरज ना स्वरांची

सर्व वस्त्रे अधीन
स्वतःचे मनच वारा
मनांना ना आगापिछा
ना आडपडदा

आपोआप समजण्याचे
आणि बेशुद्ध होण्याचे
लाल सोनेरी आकाश

हे सुख की वर्तमान
की एकांत की नृत्य
औदासीन्य की उत्सुकता
स्पर्श की विस्मृती

विरुद्ध अर्थांचे शब्द
बरेचसे गायब झालेले गाव

जिथे फक्त एक शेकोटी
हिंदी सिनेमातली
--- ००० ---

रहस्य

माझा अश्रू मला होऊ द्यायचा नाहीय
माझ्या विश्वासाचे प्रतीक
माझी वाढती नखे मी वापरणार नाही
विज्ञानाचा पुरावा म्हणून
भाषांचे अवडंबर आणि संघर्ष
मी म्हणणार नाही उत्क्रांती
आणि मनाला म्हणणार नाही सत्य

जे जे बुद्धीने कळते
ते ते चमत्कार नाही
बुद्धीचे रहस्यही
कळेलच की बुद्धीला
सत्याला कशाला हवेय दुसरे सत्य
--- ००० ---

## सूर्य

रात्रीत उगवलेला मासा
न्हात राहिला अंधारात
त्याच्या खवल्यांवर तोलत
पृथ्वीचे अवघे स्वप्न

कोणत्याही क्षणी
गळणारी पाने
त्यांच्या रंगांनी
पिकवत राहिली
आशावादी अफवांचे पीक

आता खरेच हाऊसफुल
झालेले दुकान
त्याच्यावरील
अनुभवाच्या बोज्याने वाकलेले
झाडाच्या जवळ सरकत राहिले

निष्पाप मनाने स्मित देणारी स्त्री
क्षणभर तरी पापी व्हावी
असे वाटणारा नाकतोड्या
आयुष्यच कमी असल्याने
एकदाच डसणारा
काजवा पाहून स्तिमित झाला

अशातच पहाट झाली
आणि सूर्य ओला झाला
--- ००० ---

भूमिगत

धरणातून सुटलेले
राजकारणाचे पाणी असो
की उपटसुंभांनी केलेले
धर्मनिरूपण
त्यांचा माझ्या जगण्यावर
का व्हावा परिणाम
माझ्या परवानगीशिवाय

याचे एक उत्तर मला पटते
आमची मने वेगवेगळी असली
तरी आहेत सारखीच

या भूमिगत कारणाने
आमचे एकमेकांना
प्रोत्साहनच तर असते
--- ००० ---

ऑक्सिजन सिलिंडर

तुला जिथे धोंडा दिसतो
तिथे मला फुलपाखरू दिसते
आणि तुला वाटते की
मी तो उचलुन का नाही फेकत
वा तुला त्यासाठी हात देत

मला सगळे वेगळे दिसते
ते जाऊ दे – सध्या एक मार्ग म्हणून
तू मला त्या फुलपाखराचा
पूर्ण आणि खरा इतिहास सांग
तरच मी तुझ्याबरोबर येईन

तुला फुलपाखरात इंटरेस्टच नाही
हा माझ्या समजुतीचा अपमान नाही का होत

तू तुझे सगळे सोपे सरळ सत्य
आणि अटळ धरून चालतोस
आणि मला वेगळे काही दिसणे
म्हणजे माझा दुष्टपणा म्हणतोस

निकाल देण्यासाठी
ज्याला तिथे तुझ्यामाझ्यापेक्षा
काही वेगळेच म्हणजे समज
ऑक्सिजन सिलिंडर दिसतेय
असा कुणी पाहून त्याला विचारू
-- होऊ दे आणखी गोंधळ
--- ००० ---

झाडाची ताकद

आपले शत्रू चुकीचे आहेत
ही मनोमन खात्री असणे
म्हणजेच प्रामाणिकपणा

मातीचे मुद्दे वेगळे
दगडाचे वेगळे
पण निकाल उपलब्ध
कायद्याप्रमाणेच होणार

कायद्याचा अर्थ लावणार
स्वतंत्र स्वयंभू झाड

म्हणून मुख्य म्हणजे
झाडाची ताकद हवी

प्रामाणिकपणा
कसाही वळवता येतो
--- ००० ---

घड्याळाखाली

घड्याळाखाली वाट पाहायचे ठरले होते
त्या वेळी डोक्यात रहदारी कोणती असावी
हे ठरूच नाही ना शकत

गच्च भरलेल्या माणूसगाड्या
आणि दारांतून बाहेर ओसंडते
थकव्याचे घामट पूर

पाहात आणि पाहात अधीर
अत्यंत हपापलेल्या ब्रीफकेसेस
आणि नुक्त्याच मारलेल्या सेंटच्या काळज्या

असा खूप वेळ झाल्यावर शेवटी
जायला निघणार इतक्यात धावतपळत
काही घडल्याचा भास

ना फोन ना काही त्याच घड्याळाखाली
कधी काय ठरले होते मनातल्या रहदारीसह
याच आयुष्यात घडायचे

रहदारी थांबवायचे प्रयत्न चालु
पण गर्दी आहे तशीच थकावू
आणि हो की नाही याची अर्जंट असह्य वेळ

--- ००० ---

कॅन्सरवाले

ते एकत्र जमत आणि हिरीरीने पाहात
डोंगराच्या उजव्या बाजूची गाठ
आणि तिला ते कॅन्सर म्हणत
पण दुसरेही लोक येत दुसरीकडून
ते म्हणत मुळात ती गाठच नाहीय
उलट डोंगरावर उगवत असलेली
विषारी झाडे नष्ट करायला हवीत

दोघांनाही वाटे आपले इतके स्पष्ट
साधे सरळ खरे असून वाद का होताहेत
नक्कीच हे नुसतेच क्षुद्र स्वार्थासाठी चाललेय

सगळेच सगळ्यांना खऱ्याची आणि न्यायाची
बाजू घ्या तटस्थ नका राहू असे म्हणत
संधी मिळाल्यास आम्ही तुम्हाला नीट करू
अशी अध्याहृत धमकीही त्यात असे

काहीजण म्हणत की आधी आपण
ट्रंपविषयी भूमिका घ्यायला हवी
तिथे तर जगच नष्ट होण्याचा धोका आहे

विचारस्वातंत्र्य मग वाढत जाई
आता केलेय ना मतदान
बघतील ते काय करायचे ते असे काही म्हणत

विषारीवाले प्रबळ झाल्याने कॅन्सरवाले जळफळत राहात

--- ००० ---

तळपाय

आपले काहीतरी हरवलेय
अशा विचारात आख्खी इमारत
पडायच्या बेतात उभी असते
धोक्याची म्हणून घोषित केलेली

तिचे लक्ष असते
स्वतःला अबाधित समजणाऱ्या
घड्याळे खुर्च्या टेबले यांच्याकडे

आपण स्वतःच अनिश्चित आहोत
तर आपण शोधणार  काय
या विचारात तो काढतो तंबाखूची पुडी
गायवासरूवाली – तो म्हणजे मीच

मी टाळतो पण समज
एके दिवशी तुटले आपले संबंध
माझ्या तंबाखू खाण्याच्या कारणाने
तर मी काय पाऊस
पडला म्हणून तुझा खून करू की काय

तसे तर कधी कधी तळपाय
खाजला म्हणून वाकतो तर अचानक कंबरेत
आलेल्या गोळ्यामुळे
रजाच घ्यावी लागते मला – म्हणजे त्याला

पाहू आता किती चालतेय आयुष्य ते असे

--- ००० ---

वेडा

आमच्या घराण्यात प्रत्येक पिढीत
एक वेडा असत आलेला आहे
असे आमच्या एका नातेवाईकाने सांगितले
आणि या सध्याच्या पिढीत तर
अकेला हूँ मैं

आमचा तो नातेवाईक लोकांना नेहमीच
फ्लेक्समधून दर्शन देतो
किंवा मग गणपतिविसर्जनाला
गुलाल उधळताना

मी त्याला म्हणालो तूच वेडा आहेस
फालतू जयंत्या उत्सव गुलाल फ्लेक्स
करण्यात आयुष्य संपवत राहतोस

यावर चारपाचजणांनी सौम्य मला पिटून काढले
वेडा आहे उगीच जास्त नका मारू
हे त्याने त्यांना माझ्यासमोरच सांगितले होते

आता मी शहाणा आहे की नाही माहीत नाही
पण वेड्याला वेडा नाही म्हणायचे
हे मी पक्के ठरवले आहे
--- ००० ---

राडा

कुणाकडे खोड असेल
तर कुणाकडे चमचा

माझ्या धुराने कॅन्सर होतो
तर तुझ्याने काय स्वर्ग

सर्वांचे असंबद्ध वस्तूंचे जगणे
उदबत्ती कचरापेटी सगळेच समर्थनीय

साम्य एकच की फक्त हेच शक्य
हे सर्वमान्य डबक्यातल्या शेवाळ्यासारखे

पर्यावरणाच्या नावाने रडा
पण अस्मितांचा राडा चालुच राहायला हवा

--- ००० ---

ओस

विरुद्ध लोकांना आम्ही काळोख म्हटले
पण आम्ही तर स्मारकांत लुप्त झालो आहोत
हे फार उशिरा कळले

आमचे चिलखती व्यक्तिमत्व
आम्ही मिरवत राहिलो
अनावश्यक शौर्याने
जरी हळूहळू बरेच लोक
आम्हाला नगण्य समजू लागले
पुतळे बेदखल करत

पुतळ्याने उगारलेली तलवार
ही आमची मनःस्थिती
अप्रस्तुत आहे हे समजत असूनही
आम्ही ती रेटत राहिलो
शक्य तितकी दहशत टिकवत

याद राखा आम्हाला शिकवू नका
आम्ही सूर्याची औलाद आहोत
असे आत्मविश्वासाने म्हणत
आम्ही स्वतःच पुतळे झालो

इथे प्रेमाची शक्यताच नाही हे पाहून
आमची झाडे ओस पडली
--- ००० ---

Pradnya Daya Pawar च्या २०१७ च्या भाषणात मला सापडलेली

प्रज्ञाची कविता

होय होय तीच मी
एक स्त्री एक दलित
एक दलितवादी एक स्त्रीवादी
एक दलित स्त्रीवादी
आणि तरीही दलित हिताचे आयाम
तुम्ही म्हणता तेवढेच न मानणारी
मी बौद्ध मी आंबेडकरवादी
आणि हो एक कवयित्री आणि एक साधी
मराठीची प्राध्यापिका
ना खगोलशास्त्राची ना गणिताची

असेच माझे अधिकाधिक विशेष सांगत
मला अधिकाधिक मर्यादित करण्याचे
तुमचे डाव मी जाणते बाळांनो
तुम्ही जसे म्हणता ना रिश्तेमे
हम तुम्हारे बाप लगते हैं
त्याच अर्थाने मी तुमची आई आहे

जातीय पुरोगामी आणि ब्राम्हणी दलित
येताहेत का लक्षात
स्त्रीला जातीचे प्रवेशद्वार मानणारे
कोण कोण आहेत ते पाहा ना
स्त्रीस्वातंत्र्य हे जातीजातीत
वेगवेगळे का लागणार आहे तेही बघा
-- मी मनूविरोधी असले की वाह छान

आंबेडकरवादी -- आणि दलित पुरुषाची
दडपशाही झुगारणार म्हटले की
पाश्च्यात्य पंखांची बेगडी कशी
खाजगी आणि सार्वजनिक स्वातंत्र्यात
भेद कोण का करते आणि यातून शेवटी
आम्हाला एकाकी पाडायचा आहे का डाव याचे काय

कायद्यात सामावेल का
सगळ्यांसाठी सगळा न्याय
की येतील त्यात संघर्षमय
आंतरविरोधी कलमे --
दलितांचा न्याय स्त्रियांचा न्याय
मराठ्यांचा वा ब्राम्हणांचा न्याय
होऊ शकतील का समावेशक आणि एकरूप

हे सगळे प्रश्न इतके एकत्र
की एक धागा ओढला तर
तिसरीकडेच ताण वाढावा

यावर फक्त एकच --
द गूझ इज आऊट
हे झेन सत्य क्षणात उजळणे

जेव्हा सगळेच दिसते
तेव्हा काहीच नाही उरत
हे येतेय का तुमच्या ध्यानात

माझ्या तरी कुठे येतेय
--- ००० ---

## चुका

तुम्ही असे कसे घालता कपडे
निळ्या पँटवर पांढरा शर्ट
हे अगदीच शाळकरी नाही दिसत का

तुम्ही आकाशाकडे एकटक पाहता तेव्हा
डोंगराकडे शाळेच्या इमारतीकडे निष्कारणच
तुम्ही दुर्लक्ष करता असे नाही वाटत का

इतके दिवस तुम्ही शाकाहारीच खाताय
त्यामुळे तुमची नीट टिकवायलाच हवी अशी
मांसाहारीची सवय जाणार नाही का

राजकीय भांडणात तुम्ही निकराने
काहीच नाही मांडत उसळ्या मारत यावरून
तुम्ही पळपुटे असल्याचे सिद्ध नाही होत का

अरे बाबू मोशाय डोंट वरी
मी जे जे वागतो जगतो भोगतो ते ते सगळेच
मी समजून-उमजून चुकीचे करतो असे नाही कळत का

तुम्हाला जगात सगळीकडे इतक्या चुका दिसतात
याचा अर्थच तुम्हाला कधी ना कधी शांत
झोपायला हवे असे नाही वाटत का

--- ००० ---

## सारांश

खरे तर त्यांनी माफी मागायला हवी
पण यापूर्वी तीनदा त्यांना स्वतःला माफी मागायची होती त्याचे काय
ते जाऊ द्या ही ताजी आहे
ही काय ताजी म्हणजे हेयर कटिंग आहे का
तुम्ही असंसदीय भाषेवर नका उतरू
पण मुळात असे बोलावेच कशाला
अहो नाही इतके लक्षात राहात खरे बोलुन जातो माणूस
म्हणजे तुम्ही तेवढे खरे आणि बाकी सगळे बिनखरे असे का
खरे कुणाला म्हणायचे ते तुम्ही सांगा ना मग
जरा एक मिनिट मी दोघांनाही थांबवतोय
खरे कोण हा आपला आजचा विषय नाहीय
अहो आम्ही जन्मभर माफी मागत आलोय आम्ही भिणारे नाही
खरे म्हणजे काय ते आम्हाला कुणी शिकवू नये
विचाराने प्रश्न सुटला नाही तर रस्त्यावर उतरणाऱ्यांची आम्ही औलाद आहोत
आम्हाला कुणी धमक्या देऊ नयेत ही लोकशाही आहे
तुमचे बोलायचे तर १९४९ ला तुम्ही काय केले होते हे सर्वांना माहीत आहे
मग ७७ ला तुम्ही काय केलेत हे आम्ही बोलु का
नीतीचा टेंभा कुणीच मिरवू नये
त्यांनी माफी मागून विषय मिटवायला हवा
भावना दुखवण्यासारखे काही नव्हतेच त्यात
भावना तुमच्या की आमच्या
अहो भावना सगळ्यांना असतात कधी तुमच्या कधी आमच्या

चला वेळ संपलीय मान्यवरांचे आभार
बोलणाऱ्यांनी आणि ऐकणाऱ्यांनी दोघांनीही भावनांना आवर घालावा
आणि लोकशाही अबाधित राखावी हाच याचा सारांश

--- ००० ---

उपटसुंभ

काळोख असतो मूळ
आणि उजेड असतो उपटसुंभ
कारण नसणेच असते मूळ
आणि असणे असते उपरे

आपापल्या आठवणी
समजा वाळत टाकल्या
किल्ल्याच्या काठावर
तरी शेवटी त्या वातड होणारच

आपलेपणाने कितीही
समजा गोंजारले रस्त्यावरचे दिवे
तरी त्यांच्या किरणांची धार
रक्त काढत राहणारच

म्हणून असण्याला रामराम
ठोकून निवांत असावे नसण्यात
स्वतःच उपटसुंभ असल्याचे
एकदा डोळे भरून पाहून घेत
--- ००० ---

## एवढेच नसते

जागे होताच
येणारे पक्ष्यांचे आवाज
सांगतात सगळे नॉर्मल आहे

हे एवढेच मी कुणाला
सांगून काय उपयोग

जागे होणे पक्ष्यांचे आवाज
आणि नॉर्मल असणे हे
एवढेच नसते मला सांगायचे

यासहची पोकळी सांगता आली
तर कविता पुन्हा लिहावी-वाचावी
लागणारच नाही कोणतीही

--- ००० ---

त्याच खोलीत

सत्कारांचे डोसे आणि झेंड्यांची चटणी
आणि आवाजांचे वेफर्स
खात मी बसून एका खोलीत
सर्व गोंगाट उत्साही मधमाशांचा
पूर्ण दुर्लक्ष करत

खूप झाले
आता थांबताच नाही येणार
घडावीच लागेल ती घटना
चुंबनाची
सर्व वास्तव आणि सर्व सत्ये
त्याच गर्दीत फेकून

हा उतावीळपणा
की अधीरपणा
की शीघ्र आच
की अनावर तातडी

हे काहीच विचारात न घेता
हा इथला एकाकीपणा
ओसंडतो खोलीबाहेरही

आता आत आणि बाहेर
हा फरकच संपलेला
त्याच असोबत खोलीत
--- ००० ---

## प्रत्येक कविता

प्रत्येक कविता
अशी ना तशी
कडेलोटाला यायला हवी

तसे न घडल्यास
तिच्यातली
वेडाची झाक दिसायला हवी

--- ००० ---

नाइलाज

हे तर निव्वळ तुझे
वेड पांघरणे मुद्दाम उत्तेजक
-- माझ्या मनात दिसू शकते
तुझ्या मनाला तुझी पूर्ण दुनिया
हे तुला माहीत नाही
हे कसे शक्य आहे –
छे छे मला कसे असणार माहीत
तुझ्या दुनियेचे तपशील –
मी विचारांनी थोडेच
मानलेय तुला माझे –

पण तुझ्या या नकळत डावाला
मी बळी पडतोय
समजून-उमजून
आक्रमण हाच बचाव
अशा नाइलाजाने

मीलनाचा क्षण म्हणजे
तपशीलांची गरजच नसणे
आणि तू
तुझा विजय मला अर्पण करणे
--- ००० ---

ताबा

वारा कुठून किती किती वेगात
यावा याला हजारो असतील कारणे
गरज काय प्रत्येक वेळी
उकरत बसायची
-- जेव्हा नदी कोरडी पडत गेल्याने
शहरात घुसतात मगरी
तेव्हा कोण चिंता करते की बाबा
त्यांच्यासाठी कसा हवा अधिवास

मनात येणारे मूडस
आणि कंटाळा आणि क्रोध
यांची कारणमीमांसा
कोणत्या मार्गदर्शिकेत तपासणार
रक्तदाब आणि मधुमेह संभाळत
आणि ते आहेत हे मान्य करत
सदोदित उचंबळणारे
कणांच्या लाटांचे प्रवाह जणू

जे आहे ते सगळे
गृहीतच धरले जाणार
जशा घटना आणि संघर्ष

याच्यापुढे मात्र खूप झाले
आता ताबा ठेवावाच लागेल
हे ठरवणेही असेल असंख्य कारणांनी युक्त
--- ००० ---

पलायन

होय
माझ्या कल्पनेनेच
अस्तित्वात आणता येतो
मला तो पक्षी
जो मी होऊ शकतो
आणि उडूही शकतो
त्याच्या पंखांनी

पण हे क्वचितच
कधीतरी घडते --
हट्टाने तर नाहीच घडत

मलाच अजून
तुझी आसक्ती सुटत नाहीय
तर मी तुला काय सांगू
त्या पक्ष्याचे जगणे

तुझ्या जाळ्यातून
सुटायचेच नाहीय मला
जरी चोरून घडते क्वचित
ते छोटेसे पलायन

तूच आहेस खरे तर
त्या पक्ष्यापासून सततचे
माझे कल्पनाहीन पलायन
सावयव तीव्र आणि आभासी
--- ००० ---

सत्य शोधा

हळूहळू ते
माझ्यापर्यंत येऊन ठेपते
-- अमेरिका काय करू शकेल
आणि त्याने माझे काय होईल

सगळा अभ्यास करणे
मला शक्य नाही
अगदी मीही असलो
याचा गुन्हेगार एकत्रितपणे तरीही

कायदा अर्थशास्त्र
आणि विषमतेची कारणे
हे सगळे जमवत
बसू की काय

आणि बलात्कार
आणि भ्रष्टाचाराच्या केसेस
यांचे सर्व टप्पे आणि एकूण अद्ययावत
माहिती ठेवणे नाहीच जमणार मला

मी आत्ममग्न संवेदनाहीन संकुचित
निर्दय आणि अन्यायी का झालोय
याचे तुम्हीच जमवा कारणांचे तपशील जमेल तितके
आणि लावून टाका निकाल

माझा राग मनात न धरता सत्य शोधा म्हणजे झाले

--- ००० ---

## अन्यथा

तुम्हाला दिसलेला असू शकतो
संबंध अस्तित्ववाद साम्यवाद
आणि रोज सकाळी
दहाला येणारी कचरा गाडी यांत
-- तुम्ही लिहू शकता एक कविता
विश्वाचे मूळ शोधणारी

पण तुम्हाला अडथळे असतात --
कुणी तुम्हाला क्षुद्र लेखलेले असते
कुणी तुम्हाला फसवलेले असते
किंवा कुणी गायलेले असतात
तुमच्या घराण्याचे गोडवे

तुम्हाला गोठवून टाकण्यासाठी
खूप मोठे कारस्थान चालु असते
त्याच लोकांकडून
ज्यांना नको असतो तुमच्या कवितेचा धोका

इतिहासात रमलेले आणि अपमान
होताच उसळून येणारे लोक
मुळीच सोडू इच्छित नाहीत
त्यांच्या सवयी

हे ओलांडायचे असेल तर
त्यांची कारस्थाने आधी ओलांडावी लागतील
अन्यथा विसरा ती कविता

--- ००० ---

उकळते

आधी त्वचा पराभूत होते
आणि मग नखे कडवट होतात
आणि त्यानंतर मात्र
डोळ्यांना आकाशही
वाटते विरोधक

त्यांच्या पावलांचे ठसे
उपरोधामुळे वाकडे उमटतात
आणि त्यांचे आवाज
घोगरे झालेले असतात
सततच्या त्वेषाने

ते खूप अभ्यास करतात
आणि जगाची सगळी रहस्ये
समजल्याप्रमाणे
थुंकत राहतात प्रत्येकाच्या खिशात

ते भयभीत असल्याने
शूर असतात टोळ्या करून
आणि हल्ले करतात
सगळीकडे न्यायासाठी
मोहल्ले स्वतःचे न सोडता
तिथूनच उदारपणे

ते मानवतावादी आणि शांततावादी
असून उकळते हिंसक असतात
--- ००० ---

पाब्लो सॅबोरियो ची मला आवडलेली एक कविता –

काहीच नसण्याबाबत

माझ्या त्या अवजड टेबलावर
मी पुनरावृत्ती करतो
फळाच्या त्या चवीची

ही खोली आहे लहान
किंवा असे म्हणू की जग
दुर्लक्ष करते स्वतःकडे
या क्षणापुरते

त्याला फारसा
नसतो अर्थ

हा परीघ
हा छोटासा भाग
असण्याचा

ही खोली असते मला
जिभेसारखी

स्वतःच्या पृष्ठभागाहून
फारशी अधिक
चव न घेणारी

कुठेतरी
कशाची तरी

होते सुरुवात
कुणासाठी तरी

पण माझा विश्वास असतो
न्यूनतमावर

आणि मी पुनरावृत्ती करतो
माझ्या कल्पनेची
काहीच नसण्याच्या

खूपच आधीपासून
ही खोली
सुरू होण्याच्या
--- ००० ---

माझ्याच घामातून

काहीही बोलण्यासाठी मला
या जगाचाच उपयोग करावा लागतो
माझ्या मेंदूच्या कडेकडेने
जात अंधारात
एखाद्या वासनांध कुत्र्याप्रमाणे

माझ्या आयुष्यातल्या वस्तू
प्रेयसी आणि घटना
ल्हा ल्हा करणाऱ्या
वापराव्या लागतात मला
माझीच समज घडवल्याप्रमाणे

माझी भाषा माझ्याबरोबरच
भोगत आलेली
जगाचे टक्केटोणपे
संपर्काला ओपन
एखाद्या वेश्येप्रमाणे

तरीही मला प्रेम हवेच असते
प्रमोशन हवेच असते
टाळ्या हव्याच असतात
माझी सर्जकता म्हणून
माझ्याच घामातून उगवल्याप्रमाणे

--- ००० ---

शेवाळ्यात

बहुसंख्याकांचा इतिहास
मी घोटत राहिलो
शेवाळ्यात घसरल्याप्रमाणे
मी नगण्य बेडूक असल्याने
मी सोडली नाहीत कधी
माझ्या अभिमानाची वलये
धूम्रपान शिदोरीतच नसल्याने
मी माजवू नाही शकलो
दहशत माझ्या वैभवाची
मी आत्मतुष्टपणे
राहू नाही शकलो हीरो
चमकावत
माझ्या हातातल्या उद्दाम साखळ्या
मी झालो नाही कधीच
दारू-मटण-पानयुक्त सफेद तेज

ना भांडण ना तंटा असा सभ्य
सौजन्यशील राहिलो
कष्टाळू अभ्यासू किडा
पुस्तकातला रीसेलच्या

यात माझे काय होते
या विचारात माझ्या
हुशारीपासून तर झालोच मी परका
पण जगणेही उपरेच वाटत राहिले मला
--- ००० ---

वर्ज्यच

ठीक आहे अमुक एका काळात
मी असणार आहे पण मला
मृत्यूचे अवडंबर नको आहे
विचारांचे उपरेपण नको आहे
मतांचा वेडेपणा नको आहे
प्रेम हवे माणुसकी हवी
वगैरे हवेतल्या गप्पाही नको आहेत

मी नसेन तेव्हा
हे झाड असेल नदी असेल
समुद्र आणि आकाश असेल
हेही नको आहे -- नुसती
आहे ते सुटण्याची भीती

कोण सत्य कोण न्यायाचे
कोण सात्त्विक संतापी
कोण समर्थनीय हिंसक
हे ठरवण्याची
माझी ना कुवत ना लायकी

माझा अभ्यास तर नाहीच
शिवाय आता कसे होतील बदल
याचे मला अंदाजही नाहीत

विवेक तत्त्वज्ञान अध्यात्म
मला वर्ज्यच करायचेयत – नुसते मानसिक सगळे

--- ००० ---

## इनपुटस

जातायेता पाहिलेले
घाटातले किरकोळ सोडले तर
मी धबधबे फक्त चित्रांतच पाहिलेत
तसेच गाईला फक्त खालचे दात असतात
हे मी नेटवर पाहून लक्षात ठेवलेय
सीरिया आणि इराण यांच्याबाबत वाचून
माझ्या सामान्य ज्ञानाने
ते मी समजून घेतलेय
आणि त्यांवरचे माझे भाष्य
भारताच्या अर्थकारणावरील परिणामांसह
मी मित्रांच्या आमसभेत सांगू शकतो

पाणी वाचवण्याचे महत्त्व
आणि लैंगिक शिक्षण हे मस्टच आहे
हे मी नेहमीच सांगतो

हा आख्खा देहच निसर्गातूनच जमवून
वापरात ठेवलाय
तर माहितीचे ते काय विशेष

अनेक विद्वानांच्याही मी चुका काढतो
इकडून-तिकडूनच पण काय कसे
जमवायचे ते त्यांना समजत नाही
ते चुकीचे इनपुटस घेतात

मला दांडगा आत्मविश्वास असतो

--- ००० ---

हजेरी

मी चौकशी नाही करत
की का बाबा हे केस विस्कटलेले झाड
त्या मरतुकड्या कुत्र्याकडे पाहात आहे
कारण प्रत्येक गोष्टीचे कारण आणि हेतू
यांच्या जंजाळात गुरफटले की मूळ मुद्दा
न चावता नुसताच गिळला जातो आणि मग
नंतरची सगळी दुःखपरंपरा ओढवते
हा माझा अनुभव आहे

एका बिंदूपाशी थांबून
तिथेच पूर्ण कविता लिहिता यायला हवी
असा विचार येतो तेव्हा
मी सभेला जमलेल्या गर्दीकडे दुर्लक्ष करतो
आणि कोण निवडून येईल याची काळजीच
देतो टाकून सहज जाता जाता पुलावरून
श्राद्धाचे निर्माल्यच असल्यासारखी खाली

वास्तवाचे पदर मला मनाने दिसतात
दगड हे खरे तर असतात
पृथ्वीच्या आठवणींचे पिकलेले घट्ट फोड

कवितेने अमुकच काही सांगायला हवे
असे मुळीच नाही – उलट न सांगताच
ती हजेरी घेऊ शकते हजर नसलेल्या मुलांची
म्हणजे खडसावून म्हणू शकते वाचकांना
की बाबांनो भांग पाडून जरा इथेच सूर्य उधळा

--- ००० ---

## क्रांती

नुसतेच कुणाचेतरी भक्ष्य म्हणून
मरण्यात काहीच नसते समस्या
ती येते जेव्हा
अन्याय करा वा सहन करा
या घुसमटीच्या खेळात
सक्तीने सहभागी व्हावे लागते तेव्हा

किती वर्षांनी मृत्यू येईल
याचा झाड नाही विचार करत
सापाचे भक्ष्य होणारा उंदीरही
क्षणभरच होतो विचलित
जखमी वा आजारी झालेले
प्राणी पक्षी आपोआप यथाशक्ती
सहन करत गाठतात अंत

माणसाच्या मनाचे क्रूर खेळ
व्हायला हवेत अन्नासारखे नैसर्गिक
लुटणे ओरबाडणे हवे तसे उपभोगणे
सामर्थ्यवानाचे
स्वीकारले जावे सहज अटळ म्हणून

मग ना कायद्याची गरज ना शिक्षेची
ना न्यायाची ना क्रांतीची
म्हणजे निश्चिंतपणे जगतील माणसे

पण क्रांती ही सामर्थ्यवान होण्यासाठीच तर असते

--- ००० ---

दोघीही

एकीचे रूप असणे
दुसरीचे नसणे
दोघीही
नष्ट करण्यात पटाईत

पायांची बोटेही
कार्यमग्न असणे
ही आठवण
कधीही जिवंत

दुसरीला मात्र
आठवण नाही चालत
आधीच नष्ट व्हावे लागते
तिच्या नसण्यात

शरीराने नष्ट होणे
हे अत्युच्च टोक
ओलांडणेच असते
असण्यानसण्याचे

आधी असणे बरे
मग नसणे बेश्ट
हे माझे डाव
दोघीही हसून चालु देतात
--- ००० ---

## बेकेट

बेकेट माहीत असण्यानसण्याशी
घटनादुरुस्तीचा काय संबंध
उद्या कुणी म्हणेल
माणसाच्या हाडातून
कोकिळेचा आवाज यायला हवा

जपून कधी वापरलीच नव्हती भाषा
तर आता अचानक हे अति-उंची कपडे
आणि अत्तरांचे रीतिरिवाज यांसह
हालचाली तरी कशा जमणार

सुखदुःखांच्या त्वचेखाली
इतकी वर्षे जगल्यावर
आता टाईल्सचा दर्जा गेला तेल लावत
घसरून पडणे होऊ नये
पुन्हा त्याच भूतकाळात
म्हणजे झाले

असू दे एखाद्या खुन्याचा बधीरपणा
पण मैफिलीत पहिली रांग
आणि मटणाआधी चिकनपायसूप
आणि पोराटोरांना उंची जुहू चौपाटी
हे असले की बास

मुंबई मुंबई म्हणजे तरी काय
घामच तर असतो
--- ००० ---

सर्व दुखणे

कधी कधी
अमुक विषयावर
अशी नसतेच कविता
ती असते आणि तिच्यात
एक वा अनेक विषय येतात
मोकळ्या मैदानात
जसे खेळाडू

मग घडून गेलेली चिंतने
आपोआप उमटतात
आणि गती देतात वस्तूंना
त्यांना नंतरच्या म्हणून पाहात

माझ्या पोटात काय बिघडलेय
हे कळत नसणेही येते कवितेत

कविता ही काही औषधी गोळी नसते
पण ती सामावून घेऊ शकते

जगण्याचे सर्व दुखणे

--- ००० ---

मुतारी

जे घडले तसे लिहून काय व्यक्त होईल
माहीत नाही पण करून पाहतोय

रेल्वेचा परिसर आणि तीन प्रश्न
एक म्हणजे दोन कागदांच्या तिकिटातला
एक भाग हरवलेला दुसरे म्हणजे
सोबत असलेले नातेवाईक कुठे गेले
आणि तिसरे म्हणजे फलाट
क्रमांक पंचेचाळीस कुठे आहे
यांची धावपळ आणि आता तर
लेट झालेली गाडीही येतेय

पथारीवरचा एक माणूस म्हणतो
हा घ्या तुमच्या तिकिटाचा तुकडा
तरी अजून दोन आहेत प्रश्न
तो फलाट तर टीसीलाही माहीत नाहीय

पुलावरून खाली पाहतो तर
खूप दिसताहेत रेल्वे लाईन्स
म्हणजे असणार तो फलाट
कुठल्या दिशेला जावे

तेवढ्यात गरज निर्माण होते
मुतारीची पण ती कुठे असेल

अरे वा सापडली

--- ००० ---

दारे बंद होत जातात

आस्वाद म्हणून पापण्यांवर
तोललेले सूर्याचे बालपण
अद्वितीय वळणे घेत
शेवटी मिठागरात पोचते
निसर्गात
कुणाचीच कोणतीही
तक्रार नसते कुणाही विरुद्ध
मिळेल त्या जागेतून
मार्ग काढत वाढतात
पाण्यासारखी झाडे

स्मरण आणि भाषा
विषारी करतात
प्रचंड हलता समुद्र
आणि सावध राहायला
भागच पाडतात क्षणोक्षणी
चंद्रावर हल्ला
होण्याची शक्यता गृहीत धरून

रस्त्यावर मंत्रून टाकलेला
लालबुंद भात
आणि अवयवांच्या लैंगिक आठवणी
पुन्हा पुन्हा हेच सांगतात
की तुटलेली आहेत
आकाशाची बटणे आणि
भंगलेल्या आहेत भावना
कुणीतरी अन्याय केल्याप्रमाणे

आणि एकच विषय चालतोय
सगळ्याच परिसंवादांत
की श्वास घेणे हे सहज सोपे
होण्यात कोण आहेत
झारीतले शुक्राचार्य

एवढ्यावरही नाही संपत
हे जीवजंतूंचे जन्मरहस्य
छोटे कीटक आणि मोठे प्राणी
यांना लागणारे अधिवास
वेगवेगळे असूनही
मनांची पृथ्वी तर
एकच असते अलंघ्य

हे पाहून आणि असे आहे म्हणून
आरशांचा वापर नाही थांबू शकत
तिथली संभोगदृश्ये
खरी की आभासी
हे ठरवणारे मनच तर
असते गुंगलेले उत्तेजनेत आणि मधेच
उतावीळ होत पांढऱ्या प्रार्थनेत

निवेदक कुणीही असो
कथा खरीच असते

एवढ्यातेवढ्याने हळवे होता होतानाच
थकून जात दारे बंद होत जातात
आणि धुकट होत भावनिक झोप लागते
--- ००० ---

बदल

आता काय कसे शक्य होईल
या विचारात तेच शरीर तेच मन
अशीच सगळी गर्दी
घराणे जपणारी आणि फॅशनप्रिय
आधुनिक उपचारांनी कॅन्सरमुक्ती
शक्य असल्याचे माहीत असलेली
आणि तरीही संघर्षमुक्तीची
शून्य माहिती असलेली

त्रास कशाकशाचा होतो
हे मोजून माणुसकीचे उपाय
कसे कसे आचरून
आहे यात
कशा दुरुस्त्या करता येतील
याचे विचार करत
लेखक-कवींनी
आम्हाला कसे घडवावे
हे सांगणारी भासमय
आहे ती सदोष निस्सारणयंत्रणा
हळूहळू सुधारत राहणारी
‘ आपण करू शकतो ‘ अशी घोषणा देत
आपापले स्वभाव सुसंस्कृत समजणारी
भूतकाळमय

बदल तर हवेतच म्हणणारी
--- ००० ---

एकमत

झाडे दिसावीत म्हणून आकाश असते की
आकाश दिसावे म्हणून झाडे असतात
हा प्रश्न समोर येताच कळते
ना हिंदू आद्यतायुक्त असतो ना मुसलमान
खरे तर ना विचार असतात ना बाजू
असतात फक्त वेगवेगळ्या सवयी
आधीच्यांनी नंतरच्यांना लावलेल्या
शौर्याच्या आवडीसह

झाडे आकाशाविरुद्ध
पुकारतात एल्गार
आणि आकाश ढिम्म हलत नाही
तेही शूर असल्याने

पक्षी म्हणतात प्लीज
आमचे पंख घ्या कापून हवे तर
पण आम्हाला तुम्ही दोघेही हवे आहात

मरू देत साले हे नुसते
आपला फायदा घेतात
देतात काय भोसडीचे आपल्याला
दोघेही म्हणतात

विरोध आहेच मनात
तर बंधुत्व कसले
यावर शत्रूंचे एकमत होते
--- ००० ---

## सुपारी

आता सुपारी नको म्हणतात दात
कारण कालच त्यांनी
या ओढ्याच्या पाण्यात
सहज घातली होती त्यांची दुचाकी
पण आज पाणी जास्त असल्याने ती
पाण्यातून आणि चढावरून माघारी
ढकलत बाहेर काढावी लागली

त्यांनी ज्या अन्नाचे आभार मानले
त्याचे सगळे भक्त जमले
आणि बंधुतेच्या गौरवी प्रेमात
सद्गदित होत त्यांनी
रेचक गोळ्या घेतल्या

भावना दुखावण्याचे उद्योग
टाळत हे असे भावनिक
संमीलित होणे हेच
पोटदुखीपासून मुक्ती देऊ शकते
हेच मुखशुद्धी म्हणून
अधिक टिकाऊ सत्य असते
म्हणून दातांचे उन्मळणे थांबते
हे समजणे हेच महत्त्वाचे ठरले

म्हणून वदनि कवळ घेता मरेस्तोवर
जप करावा आपल्या भावनिक एकोप्याचा
बास

--- ००० ---

## अंधार

रात्री लांब दिसणारे ते लाल दिवे
कुणी म्हणत आकाशवाणीचे आहेत
तर कुणी म्हणत विमानांचे सिग्नल्स

आम्ही नव्यानेच राहायला आलेल्या
घराच्या भिंती अनेक ठिकाणी
जणू तेल लागल्याप्रमाणे होत्या
चकचकीत तांबूस
आणि वीज नसल्याने कंदिल
वापरावे लागत दारे लावून वाऱ्यामुळे

जग याहून वेगळे असू शकते
ते माहीतच नव्हते मला

मध्यरात्री गजर लावून
आई वा वडील पाणी भरत
सकाळी सगळे छान रेडी

त्या आठवणींपासून
आज शेकडो किमी दूर आलोय
पण कधीतरी निघतातच
अंधाराचे टवके

तोच अंधार आजही पडतोच ना
प्रकाशमान का असे ना --
उद्याचा अंधार आणखीही वेगळा असेल --
--- ००० ---

परिणाम

प्रत्येकजण आपापल्या
मूडमधून पाहतो
गेट वे ऑफ इंडिया
पण हे मूडस खूप तटस्थ असणार
अन्यथा त्यांच्या परिणामांनी
भुगा झाला असता त्या दगडांचा

माझ्या असण्यातूनच कळतो
एखाद्या व्यक्तीला परकेपणा माझ्यातला
आणि त्यातून वर्षानुवर्षे टिकणारा
तयार होतो दुरावा खरे तर दगडाहून अभेद्य

डोक्यावरचे छत पडणार तर नाही
एखादा अपघात तर नाही घडणार
असे काय काय चालु असते सगळीकडे
निरनिराळ्या आणि स्वतःच्या अणूरेणूंत
पडतही असतील फरक न जाणो त्यामुळे
या भीतीने भिंती थरथरत राहतात

ताप आल्यासारखे वाटतेय
असे म्हणता म्हणता ताप येतो
आता प्रतिजैविके घ्यावी लागणार बहुतेक
म्हटले की ती लागतातच घ्यावी

अशा कल्पना नसलेले जगणे झाले तर
परिणामहीन म्हणजे कसे असेल सगळे कोण जाणे

--- ००० ---

जाऊ दे

यांनी त्यांना माफी मागायला सांगितलेय
ते अजून अर्धवटच पडलेय
आजचा मोर्चा उद्याचे आंदोलन आणि परवाचा
एल्गार यांनी ट्रॅफिकची वाट लागणार आहे
शिवाय एकदा यांचे बरोबर वाटतेय
तर एकदा त्यांचे आणि घरात आजारी माणूस
इस्पितळात न्यायची वेळ आली तर

सत्तेवर असू देत सध्या हे
पण लौकरच आपल्याला हवे ते घडेल
ट्रंप आल्यामुळे काय काय होईल
नोकऱ्या नसलेल्यांना मिळेल का दिलासा
कोण जाणे पण साली अस्वस्थता वाढतेय
चिडचिड होतेय थोडे काही खाल्ले
तरी पित्त होतेय या सगळ्याला
तेच सगळे जबाबदार आहेत साले

महाराजांच्या पुतळ्याचा एक झालाय
प्रॉब्लेम आणि घरातही सगळेच
त्यांच्या त्यांच्या कारणांनी अस्वस्थ

घुसखोर नकोतच म्हणतोय आपण
पण आपल्याला तरी इथे कोण
आपले मानतेय

जाऊ दे गटारात मरू दे सगळे

--- ००० ---

विटंबना

महाराजांचे शौर्य आणि महात्म्याची अहिंसा
असा मिलाफ तुम्हाला जगात कुठेच नाही सापडणार
या मिलाफासाठी आपण
कृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता वापरतो
हाण आणि तू हाणतोयस असे समजूच नकोस

समतेसाठी आपण जीव खाऊन आंदोलने करतो
आपला साहेबाकडे वशिला आहे
जरा उशिरा गेले कमी काम केले
चालतेय आपण स्पेशल आहोत

प्लॅटॉनिक की काय म्हणतात ना
तशा प्रेमाचे आपण पुरस्कर्ते आहोत
रोज आपले कुणीतरी आवडतच असले तरी
आपण आसक्ती न ठेवण्याचा
आटोकाट प्रयत्न करतो

कुठे कुठल्या वस्तूची किती आहे गरज
त्यावर आपण नफ्याचे प्रमाण ठरवतो
जास्तीत जास्त नफा नसेल मिळवायचा
तर धंदा करायचाच कशाला पूर्ण समाजवाद
आणून याला कुणीतरी शिस्त आणली पाहिजे

आपण आहोत नास्तिकच पण अमुक-तमुक
पुतळ्याची विटंबना आपण कदापि सहन नाही करणार
--- ००० ---

## पुन्हा

एकटीच खिडकी
हळूच बोलकी होत
जणू रहस्यच उच्चारते
स्वतःशीच
की तिची काच
विमनस्क होते तेव्हा
वारा पडलेला असतो

पानमळ्याच्या गारव्यात
पडलेल्या वाऱ्याचे गीत
आठवत राहते तिला

खरे तर ही असते
प्रेमाची पुनरुक्तीच
मन कसेही असले तरी
सत्य कवेत घेणारी

खिडकी दारे लावून घेते
तिच्या प्रेमाच्या रहस्यात
पुन्हा अबोल होत

--- ००० ---

अडथळा

जे व्हायला हवेय
ते का नाही होत
या विचारामुळे
सर्वच विचारांना
वाव मिळतो
आणि पुन्हा
जे व्हायला हवेय
ते मागे पडते

न होण्याची भीती
पकडते काळ
आणि कळते
आपणच आहोत
अडथळा

काहीही व्हायची
गरज नाही
हे सत्य मला
खिन्न करते

घ्या आता
हा अडथळा
खिन्नतेचा
--- ००० ---

## पत्ता

मी पूर्ण प्रयत्नच थांबवले
आणि निवांत रमलो बाजारात
किरकोळ देवघेवींत
आणि कळले तुला
की आता मी
धडपडणारच नाही
तेव्हा आपोआप
तुझा पत्ता हाती आला

काहीच नव्हते अंतर
म्हणजे खरेच
शिकस्तीची गरजच नव्हती

तुझा पत्ता मिळणे
हे घडणारच होते
तुलाही तेच हवे होते
हे तुझ्या स्मितावरून समजले

मनाने तुला टाकूनच देणे
हेच आहे आपल्या
मीलनाचे रहस्य

आता मी निर्धास्त आहे
तुला टाकून तुझ्या सोबत
--- ००० ---

मस्त

आयुष्याचा सगळ्यात
धोक्याचा डाव असतो
भविष्यातल्या सुखाच्या
स्पष्ट शक्यता आज समोर ठेवणे

अडकूनच जाते मन
त्याच भविष्यात बुचकळ्या मारत
आणि एकेक टाका
उसवत जातो हृदयाचा
तीव्र इच्छेने काळाशी भांडण्यात

जे घडते ते चांगल्यासाठी
म्हणजे आयुष्याने सुखासुखी
हा धोका समजायची संधी देणे

हाच असतो
जगण्याचे गूढ समजण्याचा क्षण
पूर्ण उत्तेजक भविष्य समोर
पण ते माझे नाहीच
असे लक्षात येण्यातच जगणे शक्य असणे

सुख येईल तेव्हा येवो
पण ती नसेल एक घटना
मी आज स्वीकारलेली

मी किती विरळ विरळ होत चाललोय मस्त

--- ००० ---

वास्तव

पूर्ण वास्तवात राहणारी कविता
अर्थपूर्ण नाही असू शकत
कारण ना दगडाला अर्थ असतो
ना आकाशाला
ना प्रेमाला ना द्वेषाला

जे आहे त्याच्या बाहेर
कुठला अर्थ

आणि दगडाने पालीचा
अर्थ लावणे हे निरर्थकच तर असणार

किंचित स्मिताची अर्थप्रतिमा
पाहणाऱ्याच्या बुद्धीत
सापडू लागली
की समज गैरसमज राग सूड
प्रेम संशय हिंसा
या सर्वच अर्थांच्या शक्यता
मेंदूत गरगरू लागणार

जाणवलेला अपमान
हा फक्त निरर्थक
अपमानच राहिला पाहिजे

अपमानाचे अर्थपूर्ण पंख
जिंदगी हराम करणार हे नक्की

--- ००० ---

भीतीचा कण

तुम्ही चकचकीत जमिनीवर
उभे असता सुखासीन
आणि तरीही मनात उमटतो
भीतीचा एक कण
आणि तो घालवतो
तुमचा शारीरिक तोल

यावर ताबा राहायलाच हवा
या विचाराने
भीतीचा कण उमटताच
उपटून पाहता तुम्ही
तुमचे विचारयंत्र
ताब्याच्या खात्रीसाठी

तेव्हा कळते
ताब्याचा मार्गच चुकीचा आहे
अधिकच बिघडवणारा
खरे तर नुसतेच असायला हवे
ताब्याची इच्छा न धरता

असे असे अमुक अमुक
व्हायला हवे माझे इष्ट
यातूनच तर उमटतो
भीतीचा कण

म्हणजे मृत्यू पावायचे की काय

--- ००० ---

दगडफेक

अपचनग्रस्त असतानाच
नेमके त्याचे व्याख्यान होते
जरीकाठी श्रोतृवर्गात
सेंट मारून आलेल्या

त्याने उत्तरआधुनिकतेवर
जहाल हल्ला केला
पंखे बंद झाल्यावर वीज गेल्याने
फार फार तर आधुनिक असावे माणसाने
पण उत्तरआधुनिक म्हणजे नरकच
असे म्हणत शेवटी थकून तो बसला

परतताना लोकांच्या चपला सँडल्स बूट
बदलले गेले लोकांनी वैतागून मग
रस्तेही बदलले जाऊ दे च्या बायली
आता कुठेही असे म्हणत त्यांनी
प्रदूषणविरोधी मास्क घातले

विश्वास तरी कशावर ठेवणार
मते तरी कुणाला देणार या फाटाफुटीत
या विचारात कुणी रसवंतीगृहात गेले
तर कुणी देशी दारूच्या दुकानात

काय केले पाहिजे हे त्या भोसडीच्याला
कसे काय माहीत असू शकेल असे म्हणत मग
कुठेही दगडफेक करू लागले लोक

--- ००० ---

गाभारा

मी शेवटचा कधी गेलो होतो देवळात
ते आता आठवूच नये इतका काळ लोटला
मनाच्या गाभाऱ्यातून
अनावश्यक अडगळ आणि अतिक्रमणवाली दुकाने
काढून टाकल्याला

नास्तिक म्हणून मिरवणे वा शौर्य दाखवणे
यातही नव्हते मला इंटरेस्ट
कारण स्त्रीचे निरर्थकत्व
अत्यंत उत्तेजक आणि अमर्याद असल्याने
कुणी त्याला माझा पर्यायही म्हणू शकले असते

दुसरे नव्हे त्याचाच एक भाग असे निरर्थकत्व
मला कवितेत सापडले
आधी शब्द आणि मग निरर्थकता असे
ती पाने फाडण्याचे व्यर्थ कष्ट न घेता
मी त्यांचे संग्रह केले आणि कवी झालो

आता आणखी कशाची गरजच नव्हती
नास्तिकही माझ्या नादी लागायचे थांबले होते
मी अमुक आहे असे काही म्हणायचेच नाही
म्हटल्यावर त्यांचे इंटरेस्टच गेले होते

ना हमरीतुमरीवर येणे ना बोटे मोडणे
याला जगण्याची निरर्थक आपमतलबी पद्धत
म्हणत सगळे नवविचारी पांगले होते
--- ००० ---

भवितव्य

वेडा होण्यापेक्षा कला बरी
या आत्मसंरक्षक विचाराने मी कवी झालो
आणि मग कालांतराने आले लक्षात
की इथे आपली उभे राहण्याची जागाही
नष्ट होण्याच्या मार्गावर आहे

अन्यायग्रस्तांना न्याय मिळणे
हे अग्रक्रमाचे आहे या आग्रही सत्यापायी
इथे हजारो कवितांची कत्तल होत चाललीय
त्या कवितांना निर्जीव समजून हे दिसले

थोडी जागा साफसूफ करावी म्हटले
तरी ते भडकले
काहीच हक्क नसताना या जमिनीवर
तुम्ही इथे रुजायचा प्रयत्न करताच कसे
असे म्हणत अधिकच व्यथित होत
ते अंगावर धावून आले

माझ्यासारख्या शेकडो वर्षांच्या
मनोवृत्तीमुळेच हा भेद घडल्याचे
पुनरुच्चारत माझे असणेच थांबायला हवे
असे म्हणत त्यांनी माझ्या कविता कचऱ्यात टाकल्या

मलाही आता आधार म्हणून कविता नको होती
मी तिला तिच्या भवितव्यावर सोडून दिले
--- ००० ---

उपजीविकेची न-कविता

टीव्हीतून आलेला प्रवाह
युनिटीच्या खालच्या जिन्याने
डोळ्यावर साठलेला
भूतकाळाचा डिंक बनतो

आपण कधीच
बूट नसते घातले
सिनेमा पाहण्याआधी
कारण
आत्मरक्षणासाठी
आपले चष्मे
आपण वाळत टाकले असते

मतभिन्नतेसाठी
वाऱ्यावर अन्न उधळणारे
आपण नसल्याने
आपल्या घरांचे नकाशे
कधीच गायब नाही होणार

एका किसवर
माझी भागू शकेल
अनेक वर्षांची
उपजीविका तडफदार

--- ००० ---

इत्थंभूत

केळीच्या पानावर वाढलेले
ऑफीसचे घड्याळ
सप्तरंगी पाखराचे
खेळ खेळत
चक्कर येऊन पडते

याला असंबद्ध
म्हणण्यापेक्षा
असंवैधानिक म्हणू

म्हणजे आपल्याच
पोटातले आपलेच दात
वाकुल्या दाखवत
एफायआर दर्ज नाही करणार

शेवटी जगण्याचा
हेतू तरी काय
हे पाहता निष्कारणच
कशाला प्रवास

जगण्याची स्टोरी
इत्थंभूत सफळ होण्यासाठी
मी फार तर एकदा
तीन पत्ती खेळू शकेन
--- ००० ---

अमृततुल्य

परस्पर फसलेले
मानवी सांगाडे
आपण सभागृहात आणले
तेव्हा तिथे कुणीच नव्हते

तो काही आपला गुन्हा नसल्याने
निर्भयपणे आपण अंधाराची चव घेतली

यालाच जीवनरहस्य म्हणून
खपवायचा प्रयत्न आपण केला नाही
म्हणून आपल्याला ज्ञानपीठ जाहीर झाले

आपण नम्रपणे ते नाकारून
आपला नेहमीचा
अमृततुल्य चहा प्यायला निघून गेलो
--- ००० ---

साम्राज्य

काहीच कारण नसताना
कुणी नोकरी नाही सोडत
हे खरे असले तरी
विहिरीचे झरेच आटल्यावर
काय करणार

नको नसता उपद्व्याप
म्हणून जावे प्रदर्शनाला
तर तिथे नेमकी
नको ती माणसे भेटतात

त्याने होते जागेवर येणे
जाणवल्यामुळे सगळीकडे
प्रतिमा- प्रतिबिंबांचे
नकोसे वाटणारे पण अटळ
अनभिषिक्त साम्राज्य

--- ००० ---

हिशोब

मी अनेकदा सांगितले
पायांत घुटमळत्या
कवितेला की बाई
आपल्याला
अर्थ नकोच आहे

कोणे एके काळी म्हणे
दुपारच्या वेळी
फुटली होती
एक पाईपलाईन
तेव्हा आपसूक
कळले होते
की आपले प्राक्तन
आपल्याला हिशोबच
नाही लागू देणार
जिंदगीचा

एरवी तरी कोण
बोंबलायला जाणार होते
राणीच्या बागेत
--- ००० ---

गुलाल

रुसवेफुगवे नकोत
म्हणून सरळ
मॉलच गाठला
आणि अभ्यासाऐवजी
जयंती साजरी करायचे ठरवले

जे घडूनच गेले होते
त्याला चालते
जरा तिखटमीठ
कमीजास्त झाले तरी

शास्त्रज्ञ कलावंत
यांच्यावर आनंदाने
गुलाल उधळला

--- ००० ---

पिकासो

पिकासो म्हणाला
आधी सुरुवात करा
आणि मग ठरवा
तुम्हाला डावे व्हायचेय की उजवे
आणि मग उडवून टाका
तुम्हाला नको असलेले
पुलाचे कपचे

राजकारण शिकतो
म्हणजे काय करतो आपण
आपल्याला आवडलेला सिनेमा
अनेकांच्या खिशांत कोंबतो
ते नको नको म्हणत असताना

नियम आणि शिस्त
यांची पुस्तके घेतो आपण
आठवडे बाजारातून
जिथे पतिपत्नींना एकत्र पाहून
फिसकन हसतात लोक

लपवाछपवी तर असणारच ना आयुष्यात
नग्न फिरणारे साधूही त्वचेच्या आत
कोणत्या बाळगतात पुराणकथा
याची थियेटर्स कशी असतील

एक एक असे खूप असते

--- ००० ---

## तरीही

इतका बारीक आणि चपळ पक्षी
कशासाठी आहे या जगात
हा प्रश्न आला चर्चेला
देवेंद्र आणि उद्धव भेटले तेव्हा

देवेंद्रांनी उद्धवना विचारले
मे पुं रेगे कोण होते ते सांगा
उद्धव हसून म्हणाले
आम्हीही विकसित करत आणलाय
एक रोबो
जो धर्माच्या ऐवजी
समस्यांची उत्तरेच सांगतो

मग विषय आला
चंप्र कोण हा
दोघांनीही हात झटकले
आणि योगायोगाने दोघेही
मराठी समीक्षा
या चर्चासत्राला गेले

तिथे पुन्हा तो बारीक पक्षी दिसला
तेव्हा समीक्षक म्हणाले
हा पक्षी कुठेही आलेला नाहीय मराठीत

तरीही चंप्र कोण हा विचार
सगळीकडे चालुच राहिला
--- ००० ---

नियती

नियतीचे मला नाही काही समजत
पण मला अमुक ठिकाणी तीळ आहे
हे बरोबर ओळखणारा मला भेटला होता

त्याचे म्हणणे असे की मी पाणी
फार पिणार म्हणजे पिणारच
आणि हेही बरोबर होते की
मला भाषेचे प्रेम असणारच

मी त्याची फी देऊन टाकली
पण प्रॉब्लेम पुढेच आला
जेव्हा मला म्हणू लागले लोक
की मीच बदलायला हवे माझे शरीर
जे शेकडो वर्षांत जडतघडत आलेय

माझ्या पूर्वजांनी त्यांच्या
असंख्य पूर्वजांचा
छळ केला होता
त्यामुळे त्या त्यांच्या पूर्वजांतून
उगवत आल्याप्रमाणे
मी व्हायला हवे
अन्यथा मी दुष्ट
आणि आपमतलबी आणि सुखवस्तू
असे ते म्हणाले कारण अजूनही
ते नव्हते सुटत
तयार होत आलेल्या भाषेतून
कितीही राग आला आणि कितीही

गुलामगिरी वाटली तरी

मग तुम्ही दाखवा ना बदलुन तुमची शरीरे
असे माझे म्हणणे रास्त असले तरी
सात्त्विक संताप त्यांच्या बाजूला होता

पण बदल तर घडतच असतात ना
हे तर सर्वांनाच दिसत होते
पण न्याय हवा शिक्षा हवी हेही होते हट्टाचे
सत्वर जरी क्रांती तर नव्हती दिसत शक्य

सर्वांनी अदृश्य व्हावे हा एक होता उपाय
त्या दिशेने समन्वयाचे प्रयत्नही झाले
अन्याय करणारे आणि अन्याय सहन केल्याचा भूतकाळ
असलेली मने हे सर्वच नष्ट व्हावे म्हणून
सर्वांच्या पूर्वजांचे सर्व फोटो आणि नोंदी
नष्ट करण्याचे ठरले पण मग उरणार काय
या प्रश्नाला उत्तर नसल्याने
पुन्हा समजत नसलेली नियतीच स्वीकारून
हळूहळू बदल करावे हेच बरे असे ठरले
आणि शालेय शिक्षणात त्यासाठी
सुधारणा करायचे ठरले

सगळ्यांना एकदम भूतकाळमुक्त होऊन
आजचे नवीन जगता येण्यासाठी
काय करता येईल असा एक प्रश्न समोर आला

सगळे म्हणाले जाऊ दे आध्यात्मिक काही नको

--- ००० ---

## हजारो

हजारो कंगोरे
असल्याप्रमाणे
घटनांचे जगणे
खरखरत चालु राहते
कधी धडधडत
आणि कधी आपटत

कपडे पिळणे
आणि दुःखाचे प्रसंग
वेगळे राहायला हवेत
अडेलतट्टू असेल घोडे
तर आपलेच चाबूक
आपल्याच पाठीवर
असे होत राहते
अगदी टापटीप
उत्साहातही

यावर एकच उपाय
हजार कंगवे घेऊन
विंचरून काढायची
स्मरणगाथा

हाच एक असावा उपाय
असे वाटते खरे

--- ००० ---

प्रेमकविता

काय करताय ?

प्रेमकविता लिहितोय

या वयात ?

ब्रेन-डेड होईपर्यंत लिहीन

बापरे –

नंतर माझे हृदय हवे तर तुम्हाला दान करेन

कशाला ?

अहो किती प्रचंड प्रेमाचा आनंद असेल त्यात जो तुम्हाला आयता मिळेल

तुम्हाला डिस्टर्ब नाही ना होत ?

अहो तिच्याशी लिंक माझी भर बाजारातही चालु राहते

म्हणजे पूर्ण अनुभव की बोलणे फक्त ?

अहो सहवास असला की झाले वह सब कुछ होता है

म्हणजे प्रेयसी आहे ? या वयात ?

आता तिला नाहीय काही प्रॉब्लेम

तुम्ही प्रसिद्धही करणार का ही प्रेमकविता ?

नक्कीच फक्त नावे नसतील

पण म्हणजे खरीच आहे की काल्पनिक ?

मी काल्पनिक आणि ती खरी किंवा मी सत्य आणि ती आभासी

कमाल आहे ! लोक तर खरेच धरून चालणार !

अर्थात कवितेत खरेच ना सगळे

म्हणजे मिठ्या, चुंबने असे सगळे ?

अहो नुसत्या हं किंवा हो अशा एका अक्षरातसुद्धा असते सगळे

सुरुवात कशी काय होते ?

बहुतेक सुरुवातीलाच होते अर्थात आधी मला कळत असावे

आणि पुढे ?

पुढे काय पुढे ती रागावत नाही

--- ००० ---

फोटो

घरातल्या सगळ्या
निसर्गदृश्यांची वासलात लावायचे ठरले
तेव्हा सरळच प्रश्न आला की मग
प्रत्यक्षातल्या डोंगराचे काय करावे
दुसऱ्यांनी काढलेले फोटो
आणि मला दिसणारी दृश्ये
यांत फरक तरी काय आहे
या प्रश्नाने भीती वाटली

दुसऱ्या तिसऱ्या चौथ्या
हातीचे जगणे नको म्हटले
तरी मी कुठे उमटू देतोय काही
माझ्या आठवणींशिवाय नवे
हे सत्य दातखीळ बसवणारे ठरले

आपल्याशिवायच्या त्या परस्परवाल्या
आद्य शक्यतेशिवाय
हेच ठीक स्वतःत गटांगळ्या खाणे
असाच आला विचार

जे घडतेय ते घडतेय
हे तरी कळत राहतेय
हेच समाधानाचे मानत मग
दुःखाची कळी खुलु दिली
--- ००० ---

चमत्कार

त्याने सोडलेली सिगरेट धुराची वर्तुळे
हॉटेलाची काच भेदून
पलिकडे जाताना दिसली
तेव्हा मात्र मी बिल देऊन
पटकन पाय काढता घेतला

हवे ते नाहीच घडणार
तर बाकीचे हवेय कशाला
असे म्हणून मी
दिसेल त्या स्त्रीला विचारायचे ठरवले
की वाजलेत किती

आयुष्य चांगले जाण्याबद्दल
माझ्या काही कल्पना होत्या
माझ्या आकलनाबाहेरचे
काहीच नाही दिसू शकत मला
याचा मला कंटाळा आलेला होता
म्हणून मी लगेच लिफ्ट घेतली

बाहेर आलो तर लख्ख ऊन होते
आणि समोर ती वाजलेत किती

पण नाही विचारले
असे घडणे हाही आणखी एक
चमत्कारच असे म्हणून दिले सोडून
--- ००० ---

संग्रह

चला या संग्रहाची
ही शेवटची कविता
आता आहे असा जाईल हा वेबवर
हे सांगण्यात काय आहे विशेष

मोठमोठे लोक आत्मचरित्र
सांगताना कधीही नाही सांगत
की बाबा अमुक अशी समस्या आली
आणि मग अमुक असे समजत गेले
पण ते चालते तुम्हाला
त्यांच्या यशोगाथा ऐकून
मनात टाळ्या वाजवता तुम्ही
पण त्यांच्या यशाचा आपल्याशी
काही इयाटाचाही संबंध नाही
हे नाही पाहात तुम्ही
कारण त्यांनाही ग्लॅमरचा बडेजाव
आणि तुम्हीही ग्लॅमरचेच भोक्ते

या संग्रहाला तुमच्याकडून
नकोय ग्लॅमर पण एक मात्र हवेय
ग्लॅमरचे संमोहन द्या टाकून
निदान या कविता वाचताना तरी

या कविता बाहेर काय मिळवतात
हे नका पाहू
कविताच पाहा
--- ००० ---